रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १८ • अंक २९४
www.ramprahar.com
• बुधवार, १३ मे २०२६ • पाने ८ • किंमत ₹२

## 'नीट'चा पेपर फुटला, परीक्षा रद्द; नाशिकमधून एकाला अटक

**मुंबई :** वैद्यकीय प्रवेश परीक्षेचे भविष्य ठरवणाऱ्या नीट यूजी परीक्षेचा पेपर फुटल्याचे समोर आले



आहे. त्यामुळे ३ मे रोजी घेण्यात आलेली ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय मंगळवारी (दि.१२) राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) घेतला असून पेपरफुटीच्या संपूर्ण प्रकरणाची सीबीआयमार्फत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, या पेपरफुटीचे धागेदोरे नाशिकमधून समोर आले आहेत. नाशिकमधील लीक झालेली प्रश्नपत्रिका हरियाणात पोहचली आणि तेथे फुटलेल्या पेपरचे १० सेट तयार करण्यात आले. त्यानंतर हरियाणातून बिहार, आंध्र प्रदेश, जम्मू आणि काश्मीरपर्यंत नीटची प्रश्नपत्रिका पोहचल्याची माहिती आहे. या प्रकरणात देशभरातून एकूण १६ आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यात नाशिकमधील नांदगाव येथील शुभम खैरनार (३०) याचा समावेश असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

अंतरंग

पोयनाड पोलिसांनी बालविवाह रोखला!/२

लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव विशेष/३, ६

राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी बदलापूर सज्ज/८

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आदी मान्यवर आज उलवे नोडमध्ये

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अमृत महोत्सवी अभीष्टचिंतन आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल इमारतीचा उद्घाटन सोहळा

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

सर्व समाजाचे प्रेरणास्थान, गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्त्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन सत्कार सोहळा तसेच दर्जेदार शिक्षण देणाऱ्या व नावलौकिक असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या इमारतीचा उद्घाटन सोहळा महाराष्ट्र राज्याचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. १३) सायंकाळी ६.३० वाजता उलवे नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर मैदानावर भव्य स्वरूपात होणार आहे.





या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, रोजगार हमी फलोत्पादन व खार जमीन विकासमंत्री भरत गोगावले, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व रायगड लोकसभा खासदार सुनील तटकरे, मावळ लोकसभा खासदार श्रीरंग बारणे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आमदार दिलीप वळसे-पाटील, आमदार रविशेठ पाटील, आमदार डॉ. विश्वजित कदम, आमदार मंदा म्हात्रे, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार निरंजन डावखरे, आमदार विक्रांत पाटील, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी खासदार धैर्यशील पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्यातून हजारो युवकांना रोजगार, शिक्षण व सामाजिक आधार देण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक शैक्षणिक आणि सामाजिक संस्था उभ्या राहिल्या असून समाजातील सर्व घटकांसाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर हे समाजकारणाला प्राधान्य देणारे आणि दानशूर वृत्तीचे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. गरीब कुटुंबातून पुढे येत त्यांनी संघर्षाच्या जोरावर आपले स्थान निर्माण केले. त्यांच्या कार्याचा मुख्य गाभा समाजसेवा आहे. शिक्षण, सामाजिक, आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक, आपत्ती मदत या क्षेत्रांमध्ये त्यांनी मोठे योगदान दिले आहे. अनेक शिक्षण संस्थांना मदत करून ग्रामीण आणि कष्टकरी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे त्यांनी खुली केली.

सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून लोकनेते रामशेठ ठाकूर सतत गरजू लोकांना मदत करतात. समाजातील वंचित, पीडित आणि गरजू लोकांना आधार देणे हे त्यांचे जीवनव्रत आहे. राजकारणात असूनही त्यांनी नेहमी समाजकारणाला अग्रक्रम दिला. साधेपणा, जनसंपर्क आणि लोकाभिमुख कार्यामुळे ते महाराष्ट्रातील एक आदर्श लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांचे अमृत महोत्सवी वर्ष महत्त्वाचे आणि प्रेरणादायी आहे. त्याच अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनावर आधारित आढावा घेणाऱ्या 'रामपर्व' या विशेष पुस्तकाची निर्मिती करण्यात आली असून त्याचे प्रकाशनही यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

उलवे नोड परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे या उद्देशाने उभारण्यात आलेली रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल ही प्रशस्त इमारत सुसज्ज वर्गखोल्या, अत्याधुनिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धतीमुळे परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली असून या विद्यालयाच्या इमारतीचा उद्घाटन सोहळा यावेळी होणार आहे.

या विशेष सोहळ्यास पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, हितचिंतकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर, लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समितीचे अध्यक्ष आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते व समितीचे कार्याध्यक्ष जे.एम. म्हात्रे आणि लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## पोलीस गृहनिर्माण योजना पुन्हा सुरू

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा निर्णय, निधी मंजूर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी अहोरात्र राबणाऱ्या पोलिसांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१७मध्ये पोलीस गृहनिर्माण व्याजसवलत अनुदान योजना सुरू केली होती, मात्र महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात ही योजना बंद करण्यात आली. आता ही योजना पुन्हा सुरू करीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी पाच हजार ४५९ पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या घरांसाठी एक हजार ७६८ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे.

गृह विभागाने मंगळवारी (दि.१२) याबाबत शासन निर्णय जारी केला. त्यानुसार पात्र पोलीस कर्मचाऱ्यांना बँकांमार्फत घरबांधणी कर्ज उपलब्ध करून दिले जाईल. या कर्जावरील व्याजाचा संपूर्ण भार राज्य सरकार उचलणार असून त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे प्रलंबित अर्जांपैकी पाच हजार ४५९ पात्र पोलीस कर्मचाऱ्यांच्या घराचा मार्ग मोकळा झाला आहे. यात एकूण १७६८.०८ कोटी रुपयांची आर्थिक मर्यादा निश्चित करण्यात आली असून महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत हा निधी वितरित केला जाईल. बँकांनी मंजूर केलेल्या कर्जाच्या प्रमाणात हा निधी टप्प्याटप्प्याने पोलिसांना उपलब्ध करून दिला जाणार आहे.

या निर्णयाची माहिती देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाविकास आघाडीवर टीका केली. ते म्हणाले, जनतेच्या सुरक्षेसाठी सातत्याने कार्यरत आपल्या पोलिसांना घरे मिळाली पाहिजे यासाठी प्रारंभीपासून मी आग्रही राहिलो आहे. त्यामुळेच २०१४ ते २०१९ या काळात मोठ्या संख्येने पोलिसांना घरांसाठी व्याजसवलत अनुदान योजना राबविण्यात आली. महाविकास आघाडीच्या काळात ती योजना बंद केली गेली होती. नंतर पुन्हा आम्ही ती योजना सुरू केली. आज मला सांगताना आनंद होतो की, आमच्या पाच हजार ४५९ पोलिसांना घरांसाठी घरबांधणी अग्रीम म्हणून एक हजार ७६८.०८ कोटी रुपयांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

## भिंत कोसळून सहा जणांचा मृत्यू

**सांगली : प्रतिनिधी**

सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात मोटेवाडी येथील मरगुबाई मंदिराची कच्ची भिंत मंगळवारी (दि.१२) कोसळून दोन मुलांसह सहा जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत आठ लोक जखमी झाले आहेत.

मोटेवाडी येथे मरगुबाई देवीच्या यात्रेनिमित्त हे सर्व भाविक येथे आले होते. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यापासून बचावासाठी भाविकांनी बांधकाम सुरू असलेल्या भिंतीचा आसरा घेतला. तीच कोसळली. मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे.

## पनवेलमध्ये एसआयआर कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार महाराष्ट्रात राबविण्यात येत असलेल्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी सोमवारी (दि. ११) पनवेल महानगरपालिका कार्यालयात बैठक झाली.



या बैठकीला एसआयआर अभियानाचे प्रदेश संयोजक माजी खासदार किरीट सोमय्या, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी महापालिका क्षेत्रातील विविध मतदारसंघांमधील मतदारयाद्यांचे अद्ययावतीकरण आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्याबाबत रणनीती आखण्यात आली. या बैठकीत महापालिका हद्दीत गेल्या काही काळात वितरित करण्यात आलेल्या जन्म-मृत्यू दाखल्यांच्या संदर्भातही चर्चा करण्यात आली. (पान २ वर..)




## निवडक

### वेश्याव्यवसायप्रकरणी कारवाई

**पनवेल :** अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत एका महिलेवर पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने कारवाई केली आहे . शहरातील साईनगर परिसरातील साईकला इमारतीतील एका फ्लॅटवर राहत असलेली एक महिला ती जागा वेश्या व्यवसायासाठी वापर करून पीडित महिलांना प्रलोभन दाखवून वेश्या व्यवसाय करण्याकामी त्यांना भाग पाडीत असल्याची खबर पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे याना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि शाकिर पटेल , पो उपनिरीक्षक किरण राऊत , पोना विनोद देशमुख , भास्कर चौरे ,मपोशी सुप्रिया ढोमे ,शिला सवार आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून एका ५० वर्षीय महिलेस रोख रक्कम , मोबाईल फोन व न वापरलेले कंडोम असा मिळून जवळपास ७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून सदर महिलेला अटक करण्यात आली आहे . याबाबत पुढील तपास पो उपनिरीक्षक किरण राऊत करीत आहेत.

### पनवेलची आरोही बेलोसे टॉप ५मध्ये

**पनवेल :** अॅक्सि इव्हेंट्स यांच्या वतीने वाशी येथील सिडको



सभागृहात 'मिस युनिव्हर्स महाराष्ट्र' आणि 'मिस टीन महाराष्ट्र' या भव्य राज्यस्तरीय सौंदर्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या दिमाखदार सोहळ्यात पनवेलच्या १३ वर्षीय आरोही हेमराज बेलोसे हिने आपल्या सौंदर्याने आणि आत्मविश्वासाने सर्वांना मंत्रमुग्ध करत 'टॉप ५' मध्ये स्थान पटकावले आहे. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक स्पर्धक सहभागी झाले होते. या सर्वांमध्ये आरोही ही सर्वात तरुण स्पर्धक होती, हे विशेष. अवघ्या १३ व्या वर्षी मोठ्या आत्मविश्वासाने रॅम्पवर वावरत तिने अंतिम पाच स्पर्धकांमध्ये झेप घेतली. तिने दिलेली तगडी झुंज आणि तिचे व्यक्तिमत्व पाहून परीक्षक आणि उपस्थित प्रेक्षकांनी तिचे विशेष कौतुक केले. आरोहीच्या या यशामुळे पनवेल शहराच्या वैभवात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. अत्यंत कमी वयात राज्यस्तरीय व्यासपीठावर आपली मोहोर उमटवणाऱ्या आरोही वर सध्या सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### औषध विक्रेत्यांचे आंदोलन

**पनवेल :** ऑनलाइन औषधविक्रीमुळे औषध व्यवसायातील नियमांचे उल्लंघन होत डॉक्टरांच्या असून प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री, अँटिबायोटिक्सचा वाढता चुकीचा वापर आणि बनावट औषधांचा धोका निर्माण झाल्याचा आरोप करून पनवेल तालुक्यातील तब्बल ९५० मेडिकल दुकाने २० मे रोजी बंद ठेवण्यात येणार आहेत. ई–फार्मसीविरोधात आंदोलनाचा भाग म्हणून बंद पुकारण्यात आला आहे. अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेच्या माध्यमातून देशभर एकाच दिवशी मेडिकल दुकाने बंद ठेवून ई–फार्मसीचा निषेध करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांनीही पाठिंबा दिला आहे. आंदोलनाला अँड डिस्ट्रिब्युटर केमिस्ट असोसिएशन ऑफ रायगड अंतर्गत कार्यरत असलेल्या पनवेल तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशननेही या आंदोलनात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. पनवेल संघटनेचे अध्यक्ष नितीन गावंड आणि सचिव संजय धनासुरे यांनी याबाबत माहिती दिली. मोठ्या औषध कंपन्या सवलती देऊन ऑनलाइन औषध विक्रीला प्रोत्साहन देत असल्याचा आरोप संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

### गोवंश कत्तलीसाठी नेताना पकडले

**मोहोपाडा :** अखिल आर्यंवत संघ–आंतरराष्ट्रीय बजरंग दल संस्थापक अध्यक्ष दिनेश दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गोमाता रक्षणाचे कार्य अविरत सुरू आहे. दोन गोवंश



कत्तलीसाठी बेकायदेशीररित्या घेऊन जात असताना आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या सतर्क कार्यकर्त्यांनी सदर वाहन अडवून पकडले. यावेळी आंतरराष्ट्रीय बजरंग दल जिल्हा संघटन मंत्री राजन टेकडीकर व गोसेवक गुरुनाथ बांगर , गणेश ढोणे,हेमंत भगत,रुपेश गायकर, भुषण धुमाळ , मच्छिंद्र मगर, तेजस गायकर यांनी तत्परतेने कारवाई करत कसायांच्या तावडीतून गोमातेची सुटका केली. सदर दोन्ही गोवंश तात्काळ पोलीसांच्या ताब्यात देऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. सुटका केलेले गोवंश नजीकच्या मान्यताप्राप्त गोशाळेत सुखरूप जमा करण्यात आले आहेत.

# पोयनाड पोलिसांनी बालविवाह रोखला

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वडवली आदिवासीवडीत होणारा बालविवाह पोयनाड पोलिसांनी रोखला आहे. सोमवारी (दि. ११) ही घटना घडली. पोयनाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अलिबाग तालुक्यातील वडवली आदिवासीवाडी येथे ११ मे रोजी विवाह होणार होता. यातील वराचे वय कायदेशीररित्या विवाहास योग्य नसल्याची माहिती पोलीस पाटील परशुराम पाटील यांना मिळाली. याबाबतची माहिती पोयनाड पोलिसांना दिली.

पोयनाड पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक आर. जी. नदाफ यांनी पोलीस हवालदार ए .पी. घरत आणि महिला पोलीस शिपाई पी. व्ही. घरत यांना वडवली येथे जाऊन याबाबतची चौकशी करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार पोलीस पथकाने वडवली आदिवासीवाडी येथ जाऊन पाहणी केली असता लग्नाची संपूर्ण तयारी झाली असल्याचे आणि लग्न लागण्याच्या तयारीत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी वधू आणि वराच्या पालकांकडे चौकशी केली असता वराचे वय कायदेशीर विवाहास योग्य नसल्याचे स्पष्ट झाले.

पोलिसांनी दोन्ही कुटुंबांना कायदा समजावून सांगितला. जर तुम्ही हा विवाह केला तर बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल होऊन दोन्ही कुटुंबीयांवर कादेशीर कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. दोन्ही कुटुंबीयांनी पोलिसांचे म्हणणे ऐकले. मुलाचे वय कायदेशीर विवाहयोग्य होत नाही तोवर हा लग्नसोहळा स्थगित करण्याचे मान्य केले. पोयनाड पोलिसांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे एक बालविवाह रोखण्यात यश आले आहे.

## कामोठेत १२ तास वीजपुरवठा खंडित; भाजप आक्रमक

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठेवासीयांना सोमवारी भीषण वीज कपातीचा सामना करावा लागला असून तब्बल १२ तास वीज पुरवठा खंडित झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते.

ही समस्या महावितरणच्या तांत्रिक बिघाडामुळे नसून एसटीपी प्लांटच्या कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे उद्‌भवल्याचे समोर आले आहे. दुपारी १२ वाजल्यापासून सुरू झालेला हा वीजपुरवठा रात्री १२ वाजेपर्यंत खंडित होता. मिळालेल्या माहितीनुसार, एसटीपी प्लांटचे काम सुरू असताना कंत्राटदाराने निष्काळजीपणा केल्याने जमिनीखालील मुख्य विद्युत वाहिन्या दोन ठिकाणी कट झाल्या.

विशेष म्हणजे, अशा प्रकारे नुकसान झाल्यानंतर कंत्राटदाराने महावितरणला कोणतीही पूर्वकल्पना दिली नाही तसेच तो घटनास्थळावरून निघून गेला. यामुळे नेमका दोष कुठे आहे हे शोधण्यात महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा बराच वेळ गेला. अखेर कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करून फॉल्ट शोधला आणि दुरुस्तीचे काम हाती घेतले.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत नगरसेवक विकास घरत यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी धाव घेतली आणि सुरू असलेल्या या कामाच्या ठिकाणी उपस्थित राहून त्यांनी कामाचा आढावा घेतला. विकास घरत यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत आपण संबंधित कंत्राटदारावर कडक कारवाई करण्याच्या मागणीसाठी महापालिका आयुक्तांशी सविस्तर चर्चा करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## दस्तुरी येथे एसटी बसला धडकून दुचाकीस्वार जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

लोणावळा येथून वाघजई मंदिराच्या काही अंतरावर दस्तुरी येथे महामंडळाच्या पंढरपूर ते मुंबई बस आणि मोटारसायकलचा मंगळवारी दुपारी ३.३०च्या सुमारास अपघात घडला.

या अपघातात मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाला, मात्र त्याला रुग्णालयात दाखल करण्यासाठी कोणतेही वाहन उपलब्ध नसल्याने अर्धा तास तो मार्गावरच पडून होता. खोपोलीमधून रुग्णवाहिका पोहचल्यानंतर जखमी युवकाला खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. युवकाला गंभीर स्वरूपाची इजा असल्याने पुढील उपचारासाठी एमजीएम रुग्णालय कळंबोली येथे दाखल करण्यात आले आहे. रोहन चव्हाण (२२, रा. पेडली, ता. सुधागड) असे त्याचे नाव आहे.

## पावसाळ्यात नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्या –मंत्री गणेश नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

आगामी पावसाळ्यात नवी मुंबईतील नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागू नये, यासाठी वनमंत्री नामदार गणेश नाईक यांनी वाशी येथे आयोजित करण्यात आलेल्या मान्सूनपूर्व आढावा बैठकीत महापालिका प्रशासनाला महत्त्वपूर्ण निर्देश दिले.



वाशीतील सिडको प्रदर्शनी केंद्रामध्ये पार पडलेल्या या बैठकीत माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, सभागृह नेते सागर नाईक, महापालिकेचे आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, नगर अभियंता शिरीष आरदवाड, महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

शहरातील सखल भागांमध्ये पाणी साचू नये आणि पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहण्याचे निर्देश वनमंत्री नाईक यांनी दिले. विशेषतः नाले, गटारे आणि पावसाच्या पाण्याचा निचरा करणाऱ्या वाहिन्यांची साफसफाई वेळेत आणि काटेकोरपणे पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना वनमंत्री नाईक यांनी दिल्या.

पावसाळ्यात शॉर्टसर्किटमुळे जीवित व मालमत्तेची हानी होऊ नये यासाठी उघड्या विजेच्या तारा, डीपी बॉक्स, ट्रान्सफॉर्मर आणि धोकादायक विद्युत यंत्रणांची तात्काळ दुरुस्ती करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच रस्त्यांलगत व वस्ती परिसरातील झाडांच्या धोकादायक फांद्यांची छाटणी करून संभाव्य दुर्घटना टाळण्यावरही भर देण्यात आला.


शाळा सुरू होण्यापूर्वी सर्व शाळा इमारतींची दुरुस्ती पूर्ण करावी तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळांमधील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत की नाही, याची तपासणी करावी

मुसळधार पावसामुळे डोंगर परिसरातून मातीचे लोंढे खाली येऊन डोंगरपायथ्याशी आणि खाणी परिसरातील झोपड्यांना धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, अशा दुर्घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देशही देण्यात आले.

# जंजिरा किल्ला ब्रेकवॉटर व प्रवासी जेट्टीचे आज लोकार्पण

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

मुरूड तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील अरबी समुद्रात असणाऱ्या ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यात पर्यटकांना चढ उतार करण्यासाठी ब्रेकवॉटर व प्रवासी जेट्टी राज्य शासनाने सागरमाला योजनेंतर्गत ९३.५६ कोटी खर्च करून पर्यटकांच्या सुरक्षेसाठी बांधण्यात आली होती. हे जेट्टीचे काम दोन महिन्यांपूर्वी पूर्ण झाले होते. या जेट्टीला मुहूर्त मिळाला असून या जेट्टीचे लोकापर्ण सोहळा दिनांक दि. १३ मे २०२६, सकाळी ११.३० वाजता महाराष्ट्राचे मंत्री, मत्स्यव्यवसाय, बंदरे, तथा पालकमंत्री सिंधुदुर्ग, यांच्या हस्ते आणि खासदार सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.



यावेळी महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले, खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेश बालदी, विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे, विधान परिषद सदस्य–ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी आमदार अनिकेत तटकरे, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, भा.प्र.से.मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र सागरी मंडळ प्रदीप पी. यांची उपस्थिती लाभणार आहे.


## पनवेल महानगरपालिका
## ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६

जा.क्र.पमपा/सचिव/२०–२६/प्र.क्र.०५/१८७/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :– १२/०५/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**

प्रति,
श्री./श्रीमती.
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.

महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक **२०/०५/२०२६** रोजी, सकाळी **११:००** वाजता, महापालिकेच्या "आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०५, दिनांक २०/०५/२०२६ ची**

**विषयपत्रिका**

**१. मागील सर्वसाधारण सभा क्र.३, दिनांक ०१/०४/२०२६ तसचे सर्वसाधारण सभा क्र.४, दिनांक २४/०४/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.**

**२. निवडणुक –**

१. पनवेल महानगरपालिकेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम **२९** (अ) नुसार प्रभाग समित्या स्थापन करणे. (प्रभाग समिती कार्यक्षेत्र निश्चित करणे.)

**३. प्रश्नोत्तरे**

**४. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :**

१. Regarding appointment of third party organization to prepare "City Climate Action Plan" for Panvel City. या कामाकरिता रुपये **६४,००,०००/–** (रुपये चौसष्ठ लाख मात्र) (GST सह) रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड, प्रभाग क्र.**१९** मधील अं.भु.क्र.**५०६** कोळीवाडा मार्केड यार्ड परिसरातील स्मशानभूमी विकसीत करणे. या कामाच्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.

३. पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील से. **१२**, भुखंड क्र.**०१** या उद्यानाचे नुतनीकरण करणे.

४. पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करण्याबाबत.

५. पनवेल महानगरपालिकेकरीता कार, जीप, इनोव्हा, रिक्षा, बस, टेम्पो, ट्रक, रुग्णवाहिका व इलेक्ट्रिक (कार/जीप) वाहने वाहनचालकासह भाडेतत्वावर पुरविणे या कामाची ई निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

६. पनवेल महानगरपालिकेकरिता डंपर/टिप्पर, हायड्रा, क्रेन, फराना, पोकलेन, टोईंग व्हॅन वाहने चालक/ऑपरेटरसह भाडेतत्वावर पुरवठा करणे या कामाची ई निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

७. पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील सेक्टर **१४**, भुखंड क्र. **०९** येथे उद्यान विकसित करणे.

८. पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील सेक्टर **०७**, भुखंड क्र. **२०** येथे उद्यान विकसित करणे.

९. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.**२०** भिंगारी गावामधील अंतर्गत पावसाळासाठी गटाराचे बांधकाम करणे.

१०. पनवेल महानगरपालिका नवीन मुख्यालय इमारती समोरील रस्त्यावर डेकोरेटीव्ह पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करणे.

११. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ब मधील कळंबोली गावाच्या मुख्य प्रवेशव्दारापासून ते नारायण जाधव चाळ पर्यंत रस्त्याचे काँक्रिटीकरण व गटाराचे बांधकाम करणे.

१२. दहरंग धराणातून पनवेल शहराकरीता वाढीव पाणी पुरवठा योजना करणेकामी प्रस्ताव जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुर्नवापर योजने अंतर्गत (MEWREP) प्रशासकीय मान्यतेकरीता शासनास सादर करणेबाबत.

१३. देहरंग येथे पाणी साठवणाकरीता बॅरेज बांधणे प्रस्ताव केंद्र शासनाच्या Urban Challenge Funds अंतर्गत प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करणेबाबत.

१४. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड, प्रभाग क्र. **१९**, अं.भू.क्र. **२४१,२४२** पार्ट पनवेल या भूखंडावरती दूकाने व बहुमजली वाहनतळ बांधणे प्रस्ताव केंद्र शासनाच्या Urban Challenge Funds अंतर्गत प्रशासकीय मान्यतेकरिता सादर करणेबाबत.

१५. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात यांत्रीकी पध्दतीने धुरिकरण व फवारणी सेवा पुरविणेबाबत.

**(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)**

**सही/–**
**नानासाहेब कामठे**
**महानगरपालिका सचिव**
**पनवेल, महानगरपालिका**

**महापालिका भवन, पनवेल**
**दिनांक : १२/०५/२०२६**


पान १ वरुन

### पनवेलमध्ये एसआयआर कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा

या बैठकीला महापालिकेचे सभागृहनेते अॅड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नगरसेवक परेश ठाकूर, रवींद्र भगत, सुमित झुंझारराव, अजय बहिरा, शशिकांत शेळके, प्रीती जॉर्ज, अस्मिता घरत, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे आदी उपस्थित होते. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारयाद्या दोषमुक्त करणे आणि अवैध नोंदी रोखणे यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला.

# डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून पेण उपजिल्हा रुग्णालयाला वैद्यकीय उपकरणांचे वाटप

**पेण : प्रतिनिधी**

ज्येष्ठ निरूपणकार महाराष्ट्र भूषण डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या मार्फत पद्मश्री डॉ श्री आप्पासाहेब धर्माधिकारी व रायगड भूषण सचिनदादा धर्माधिकरी यांच्या मार्गदर्शनाखाली पेण येथील पेण उपजिल्हा रुग्णालयाला तब्बल ७० प्रकारची वैद्यकीय उपकरणे, औषधे व आरोग्य साहित्याचे वितरण कार्यक्रम पेण येथील मराठा समाज हॉलमध्ये उत्साहात पार पडला.



आरोग्य सेवेला अधिक सक्षम आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास श्री सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.

या प्रसंगी पेण नगरपालिकेचे मुख्याधिकारी जीवन पाटील, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, उप परिवहन कार्यालयाचे अधिकारी गुलाब सोळंकी तसेच पेण उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक संध्यादेवी राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत वैद्यकीय उपकरणांचे वितरण करण्यात आले.

प्रतिष्ठानच्या माध्यमातून रुग्णालयाला देण्यात आलेल्या साहित्यामध्ये मल्टीपॅरा मॉनिटर, डिजिटल बीपी मशीन, डिफिब्रिलेटर मशीन, फोटोथेरपी युनिट, ऑक्सिजन फ्लो मीटर, व्हीलचेअर, संगणक संच सर्जिकल साहित्य, विविध इंजेक्शन्स, औषधे तसेच अत्यावश्यक वैद्यकीय साहित्याचा समावेश आहे. कार्यक्रमाचे नियोजन श्री सदस्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडले.

# कठोर संघर्ष आणि प्रामाणिक प्रयत्नांमुळे आयुष्य घडवता आले : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर

**माजी खासदार, रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सन्माननीय सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांची संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी घेतलेली मुलाखत...**

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** आदरणीय ठाकूरसाहेब, या मुलाखतीसाठी आपण आम्हाला वेळ उपलब्ध करून दिलात, त्याबद्दल प्रारंभीच आपल्याला मनःपूर्वक धन्यवाद देतो...

**ठाकूरसाहेब :** रयत शिक्षण संस्थेविषयी मला प्रचंड जिव्हाळा आहे. संस्थेमधून कोणी आलं की आपोआपच हातातली कामे बाजूला टाकून थांबावसं वाटतं..

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** अर्थात रयत शिक्षण संस्थेवर असणार आपलं प्रेम सर्वश्रुत आहेच. आपण विद्यार्थीदशेत काहीएक काळ संस्थेत शिकलात. त्यानंतर इतकं मोठं आभाळाएवढं उत्तुंग कर्तृत्व आपण सिद्ध केलंत. एकंदर आपल्या आयुष्याला आणि काळालाही विलक्षण गती प्राप्त झाली. तरीही या सगळ्यातून आपण संस्थेला वेळ देत राहिलात. संस्थेच्या प्रत्येक शाखेवर आपल्या स्नेहाचा सातत्याने वर्षाव होत आला आहे..

**ठाकूरसाहेब :** खरंतर रयत शिक्षण संस्थेने दिलेले संस्कार आणि जीवनमूल्ये यांच्या बळावरच माझी वाटचाल झाली. त्यामुळे कृतज्ञतेच्या भावनेने आणि आयुष्यातील अत्यंत खडतर काळातील काळीजकप्प्यात साठवून ठेवलेल्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा मिळणार असल्यामुळे मी भावनिक पातळीवर आपल्या सगळ्यांशी जोडला गेलेलो आहे.

मी संस्थेला वेळोवेळी मदत केली, ही गोष्ट मला मोठी वाटत नाही. तो माझ्या स्वभावाचा भाग आहे आणि संस्थेच्या शिकवणीनुसार आपण प्रगती करीत असताना पाठीमागच्यांना हात देणं हे आपलं कर्तव्य आहे, असं मी समजतो.

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** साहेब, आज आपण सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि उद्योग क्षेत्रात उत्तुंग कर्तृत्व गाजवले आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात तसं 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे' आपण कष्टपूर्वक धनसंपत्ती मिळवलीत. समाजाच्या विकासासाठी आपण ती खर्च करीत आहात. आपल्या प्रवासाची सुरुवात नेमकी कशी झाली? आज या मुलाखतीच्या माध्यमातून आपला प्रवास आम्हाला जाणून घ्यायचा आहे. आपलं बालपण, जडणघडण आणि शैक्षणिक वाटचालीबद्दल काय सांगाल?

**ठाकूरसाहेब :** आजचा रायगड जिल्हा तेव्हा कुलाबा जिल्हा म्हणून ओळखला जात होता. कुलाबा अर्थात कर्जतपासून श्रीवर्धनपर्यंत आणि पोलादपूरपासून मुंबईला लागून असलेल्या पनवेल तालुक्यापर्यंत विस्तारलेला भाग. पनवेल तालुक्यात पश्चिमेला समुद्राच्या कुशीत शिरून विसावलेलं आगरी-कोळी समाजाचं न्हावाखाडी हे छोटसं गाव. कायम समुद्राच्या भरती ओहोटीच्या कक्षेत येणाऱ्या या गावातील सगळीच कुटुंब समुद्र आणि शेतीवर आपली गुजराण करायची.

न्हावाखाडीच्या उत्तर पाड्यावर राहणाऱ्या माझ्या आई-वडिलांचं अर्थात चांगू काना ठाकूर आणि भागुबाई यांचं पहिलं अपत्य म्हणजे मी. २ जून १९५१ ही माझी सरकारी जन्मतारीख म्हटली पाहिजे, कारण या जन्मतारखेची नोंद शाळा मास्तरांनी केलेली आहे, पण आईचं म्हणणं असं की, माझा जन्म झाला तो दिवस शनिवार होता, ऋषिपंचमी होती. या तिथीचा मागोवा घेतला की ती तिथी भाद्रपद शुक्ल पंचमी, शनिवार दिनांक १६ सप्टेंबर १९५० अर्थात ऋषिपंचमीच्या या दिवसापर्यंत जाते.

तशी माझी ही पहिलीच शिकलेली पिढी. वडिलांना स्वतःचं तीन अक्षरी नाव लिहिण्यासाठीसुद्धा पाच मिनिटांचा वेळ लागे. माझी आई अतिशय शांत, संयमी आणि तितक्याच करारी बाण्याची स्त्री होती. वडील कमालीचे रागीट आणि कडक शिस्तीचे होते. स्वच्छता, टापटीप आणि कष्टावर कमालीचा कटाक्ष असायचा त्यांचा. त्यांना वावगं काहीही आवडायचं नाही.

घरात निस्वार्थ आणि चांगुलपणाचं वातावरण होतं. त्या काळात सगळ्यांचीच परिस्थिती बेताची होती. खाणारी तोंडी जास्त आणि उत्पन्नाचे साधन मात्र फक्त शेती. वडील शेतीत काबाडकष्ट करत. शिवाय शेतीच्या जोडीला खाडीतून रेती काढण्याचा जोडधंदाही होता. भरतीचं पाणी शेतजमिनीत शिरू नये म्हणून गावकऱ्यांनी संपूर्ण खाडीलगत बंधारा बांधला होता.

१९५६-५७चा काळ असेल. मी त्यावेळी न्हावाखाडीतील प्राथमिक शाळेत पहिलीच्या वर्गात दाखल झालो. वय होतं पाच वर्ष. त्या काळात आजच्यासारखी पूर्व प्राथमिक वर्गाची संकल्पनाच नव्हती. वयाची पाच वर्षे पूर्ण झाली की थेट पहिली इयत्तेत नाव घातलं जायचं.

एक-दोन वर्षे गेली. याच काळात न्हावाखाडी गावात समुद्राचे पाणी शिरू नये म्हणून बांधलेला बंधारा फुटायला सुरुवात झाली होती. शेवटी प्रयत्नांची पराकाष्टा करून गावकऱ्यांनी बंधारा बंदिस्त करण्याचा घाट घातला, पण पाण्याचा दाब जास्त असे. पुढची अनेक वर्षे पाणी, बंधारा आणि गावकरी यांचा एकमेकांशी संघर्ष सुरूच होता. बंधारा रोखण्याचा प्रयत्न गावकऱ्यांनी हरतऱ्हेने केला, पण यश आले नाही. १९५६च्या सुमाराला बंधारा जास्त फुटायला सुरुवात झाल्यानंतर त्याची डागडुजी करणं जिकिरीचं व्हायला लागलं. गावातील परिस्थिती झपाट्याने बदलत होती. सगळेच चिंताक्रांत झाले होते. या परिस्थितीचा अंदाज घेऊन वडिलांनी मला दुसरी पास झाल्याबरोबर माणगावला मामेभावाकडे पाठवण्याचा निर्णय घेतला.

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** अच्छा! म्हणजे त्यामुळे पुढील शिक्षणासाठी तुम्हाला गाव सोडावे लागले. मग पुढचा प्रवास कसा झाला?

**ठाकूरसाहेब :** हो! दशरथ पाटील हा माझा मामेभाऊ शिक्षक म्हणून आताच्या तळा तालुक्यात असणाऱ्या दगडधूम अर्थात गणेश नगर शाळेत कार्यरत होता. माझ्या शिक्षणात व्यत्यय नको म्हणून वडिलांनी मला तिसरीसाठी दशरथ पाटलांकडे पाठवले. सरकारी नोकरीत बदली हा अविभाज्य भाग असतो. दशरथ पाटलांची बदली माणगावहून उणेगावच्या शाळेत झाली. पुन्हा दशरथ पाटलांच्या बरोबर माणगावहून उणेगावला जावे लागले.

उणेगावातले दिवस आनंदाचे होते. जीवाभावाचे अनेक सोबती या शाळेत मला मिळाले. यामध्ये सहदेव शिंदे, काशिनाथ शिंदे यांची नावे आवर्जून घ्यायला हवीत, कारण तिसरी-चौथीला असताना त्यांच्यासोबत जुळलेला स्नेहबंध आजही टिकून आहे. याच काळात न्हावाखाडीत हाहाकार माजला. बंधारा पूर्ण ढासळून गेला. समुद्राच्या उधाणाला पाणी घराच्या दारापर्यंत



येऊन पोहचत होते. गावकऱ्यांसमोर पर्याय नव्हता. तरीही अनेक जण गावातच राहत होते. गावातील गोड्या पाण्याचे साठे आता समुद्राच्या पाण्यामुळे खारे झाले. गावकऱ्यांच्या वाट्याला पाण्यासाठी पायपीट आली. शेती खाऱ्या पाण्याखाली बुडाली होती.

हातातोंडाची गाठ पडणे मुश्कील झाले. सगळे दिवस फिरले होते, पण तरीही मुलाला आपल्यापासून किती काळ दूर ठेवायचं या प्रश्नाने व्याकुळ झालेल्या वडिलांनी मला पुन्हा न्हावाखाडीला आपल्याजवळ आणले. पुन्हा गावातील प्राथमिक शाळेत माझं नाव पाचवीच्या वर्गात दाखल करण्यात आलं. पाचवी आणि सहावी जेमतेम दोनेक वर्षे मी न्हावाखाडीतील शाळेत शिकलो. गरिबी वाढतच होती. लोक अन्नाच्या शोधात बाहेर पडू लागले होते. गावात राहण्यात अर्थ उरला नव्हता. अखेर नाईलाजाने गावकऱ्यांनी गाव सोडण्याचा निर्णय घेतला.

तीन पाड्यांतील जवळपास ५० टक्के लोक गाव सोडून निघून गेले. वडील कुटुंबाला घेऊन उदरनिर्वाहासाठी गव्हाणला आले. कोपरगावच्या पश्चिमेला असलेल्या माळरानावर 'शिवाजीनगर' या नावाने वसाहत तयार झाली. शिवाजीनगरला आल्यावर मी गव्हाणच्या शाळेत सातवीच्या वर्गात जाऊ लागलो. कुटुंबाचा शेती व्यवसाय पूर्णपणे पाण्याखाली बुडाला होता. आता जोडधंदा असलेला रेतीचा व्यवसाय करावा लागत होता. शेती बुडाल्यामुळे वडिलांनी पूर्ण लक्ष रेतीच्या व्यवसायावर द्यायचे ठरवले.

मोठा होत गेलो तशी जबाबदारीची जाणीव होऊ लागली. आपल्याला आपल्या घरासाठी काहीतरी केलं पाहिजे याची समज आली आणि मग शाळेला सुट्टी असली की वडिलांसोबत मचव्यावर जाऊ लागलो, कारण सगळ्यांनी काम केलं पाहिजे असा वडिलांचा शिरस्ता होता. समुद्रात डुबकी मारून रेती कशी काढायची हे वडिलांनी मला शिकवले.

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** म्हणजे साहेब श्रमाचा संस्कार वडिलांनीच आपल्यावर केला तर...

**ठाकूरसाहेब :** बरोबर, कष्टाने कमावलेलं काहीही असो वाया जाऊ द्यायचं नाही ही वडिलांची शिकवण माझ्या जगण्याचा मूलमंत्र झाली. जीवन जगण्याचा मूर्तिमंत वस्तुपाठ वडिलांकडून आत्मसात केला. शाळेत पाटी फुटली तर पाठीवर धपाटे मिळायचे. पेन्सिल हरवली तर वेळप्रसंगी लाथासुद्धा खाव्या लागायच्या. समुद्रातून कष्टाने काढलेल्या रेतीने जगण्याची परिभाषा शिकवली होती.

खरंतर न्हावाखाडी सोडून शिवाजीनगरला राहायला गेल्यानंतर न्हावाखाडीचा अंक संपला होता. खाडीवरच्या शाळेतल्या आठवणी सोबत घेऊन गव्हाणच्या शाळेत सातवीला प्रवेश झाला होता. आयुष्य इतक्या बालवयात किती वेळा कूस बदलणार हे मला समजत नव्हतं.

पडावावर गेल्यानंतर आठ आणे मिळायचे. मी समुद्रात पडावावर जेवण बनवायला जायचो. हे दिवस आणि हलाखीची परिस्थिती होती. अशा परिस्थितीतही शिक्षण थांबले नव्हते. आजूबाजूचे अनेक सोबती शिक्षणाच्या प्रवाहातून बाजूला पडले. मी मात्र जिद्दीने शिकत राहिलो.

न्हावाखाडी, माणगाव, पुन्हा न्हावाखाडी आणि आता गव्हाण अशी शिक्षणासाठी भटकंती झाली होती, पण चिकाटी मात्र सोडलेली नव्हती. गव्हाणची शाळा कौलारू चाळीसारखी लांब इंग्रजी एल अक्षरासारखी होती. शाळेसमोर मोठं मैदान होतं. वि.चा. म्हात्रे गुरुजी, सोलकर गुरुजी अशी ध्येयवादी शिक्षकांची शिस्तबद्ध शिकवणी या शाळेत चालू असायची. तो काळ जुना होता. निष्ठा जपणारे लोक होते. शिक्षकाकडे नैतिक मूल्यं होती. हे शिक्षक मुलांकडून प्रचंड मेहनत करून घेत. दिवसाच्या शाळेबरोबर रात्रीची शाळादेखील भरवत, मात्र रात्रीचा वर्ग अभ्यासासाठी असायचा. शिस्तीचा शिरस्ता कुणीही मोडू शकत नव्हते. स्वतःच्या मुलाप्रमाणेच हे शिक्षक शाळेतील विद्यार्थ्यांना वागवत असत. त्या काळात वीज नव्हती. विजेचे दिवे आले नव्हते. रॉकेलचा टेंबा लावून त्या उजेडात अभ्यास करावा लागत असे. अभ्यासाच्या वेळी अभ्यासच होत असे. शिक्षक समोर बसवून अभ्यास करून घेत असत. शाळेतच झोपायचं आणि शाळेतच लवकर उठून अभ्यास करायचा असा पायंडा पडला होता. सकाळी आवरण्यासाठी एक किलोमीटर चालत शिवाजीनगरला यावं लागत असे. रात्रीची शिळी भाकरी आणि जे काही उपलब्ध असेल ते आई शेकून ठेवत असे. शाळा पुन्हा अकरा वाजता भरत असल्यामुळे पुन्हा सगळं आटोपून शाळेकडे रवाना व्हावे लागे. दुपारी दोन वाजता जेवणाची सुट्टी व्हायची. तेव्हा पुन्हा एकदा पोटात पडलेली आग शिवाजीनगरच्या दिशेने पळायला लावायची. पोटभर जेवण करून माघारी शाळेत यावे लागे. पुन्हा अभ्यास आणि शिक्षकांचे तास होत. संध्याकाळी शाळा सुटली की आगगाडीचा आवाज ऐकत त्या आवाजाबरोबर घराकडे धावत सुटणाऱ्या मुलांचा गलका होई. दिवस गरिबीचे होते, परंतु माणसा-माणसांमध्ये आपुलकी आणि प्रेम अफाट होते. शाळेतील मित्रमंडळी कुटुंबातील सदस्यांसारखी होती. वाय. टी. देशमुख, मजीद सोलकर हे वर्गातले हुशार विद्यार्थी. सोलकरचा तर वर्गात पहिला नंबर असायचा. मी आणि वाय.टी. देशमुख दुसऱ्या किंवा तिसऱ्या नंबर वरखाली असू. सगळ्या बाजूंनी प्रतिकूलता असतानादेखील गव्हाणच्या शाळेतील या निष्ठावंत शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया मजबूत करण्यावर भर दिला. तहानभूक विसरून त्यांनी विद्यार्थ्यांसाठी ज्ञानदान केले. त्यामुळे अभ्यासाची गोडी या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली होती. १९६०च्या सुमारास कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली आपली रयत शिक्षण संस्था कोकणात उतरली.

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** हा खूप महत्त्वाचा संदर्भ आहे, कारण याच काळात कर्मवीर अण्णांच्या निधनानंतर संस्थेचे काम पुढे घेऊन जाणारे निष्ठावंत कार्यकर्ते शिक्षण प्रसाराची चळवळ पुढे घेऊन जात होते.

**ठाकूरसाहेब :** हो हो, मला आठवतं डॉ. एन.डी. पाटीलसाहेब त्यावेळी कोकणात येत. त्यांच्याबरोबर त्या काळातल्या कर्त्या मंडळींनी पुढाकार घेऊन उरण-पनवेल विभागातली पहिली शाळा जासई येथे सुरू केली. यामध्ये जनार्दन भगत, दत्तूशेठ पाटील, दि.बा. पाटील या जाणत्या लोकांचा पुढाकार होता. शिक्षणाचे महत्त्व लोकांना समजू लागले होते. या भागातल्या सर्वसामान्य जनतेला शिक्षणासाठी शाळांची निकड जाणू लागली होती. रयत शिक्षण संस्थेच्या शाखांची संख्या वाढविण्यासाठी स्थानिक पातळीवर आणि संस्थेकडूनही प्रयत्न सुरू झाले. पुढे पनवेल, उरण भागात शाळांची संख्या वाढत गेली. गव्हाणला १९६३-६४च्या सुमारास छत्रपती शिवाजी विद्यालय, गव्हाण या नावाने शाळा स्थापन झाली. अर्थात कोणतीही भौतिक साधनसामग्री त्यावेळी उपलब्ध नव्हती. शाळेचे वर्ग धर्मा ठाकूर यांच्या घरात सुरू झाले. धर्मा ठाकूर यांच्या घराच्या माडीवर ३५ विद्यार्थ्यांचा आठवीचा वर्ग भरत असे. याच काळात गव्हाणच्या प्राथमिक शाळेत मी सातवी इयत्तेत शिकत होतो. पुढे गव्हाण हायस्कूलला गेलो. शाळेत आठवीला असताना नववीचा वर्ग पुढे सुरू झाला. टप्प्याटप्प्याने पुढचे वर्ग वाढत होते, पण विद्यार्थ्यांना बसायला जागाच नव्हती. जागेचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. धर्मा ठाकूर यांच्या घरात तिथंही जागा कमीच पडत असे. शेवटी ठाकूर यांच्या घरातील गुरांचा गोठा ज्या बाजूला होता त्याच्या बाजूच्या पडवीत नववीचा वर्ग भरायला सुरुवात झाली. गुरांच्या शेणामुताचा वास घेत मुलं शिक्षणासाठी निष्ठेने तिथं बसून राहत. पुढे हे वर्ग वाढत दहावीपर्यंत गेले. पुन्हा बसण्याच्या जागेची अडचण होतीच. विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन लक्ष्मीबाई देशमुख आणि सदूभाऊ देशमुख यांनी आपल्या मालकीची एक एकर जमीन शाळेसाठी दिली. ओबडधोबड असलेल्या या जागेचे सपाटीकरण करण्यासाठी जनार्दन भगतसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांनी आणि विद्यार्थ्यांनी श्रमदान करून खोदाई केली. विटा, सिमेंट, रेती डोक्यावर वाहून आणली. निवडुंगाचे कुंपण घातले. अथक परिश्रम घेतले गेले. त्या काळातील पुढाऱ्यांची दूरदृष्टी या कामी उपयोगी पडली. दहावी आणि अकरावीच्या वर्गांसाठी पत्र्याची शेड असलेल्या दोन खोल्या तयार करण्यात आल्या. मी या शाळेत शिकायला आलो आणि आयुष्यभरासाठी या शाळेशी जोडला गेलो. शाळेतले मित्र आयुष्यभराचे साथी झाले. यामध्ये वाय. टी. देशमुख, हरिभाऊ देशमुख, गोपीनाथ कोळी, मजीद सोलकर, रमण घरत, बंदू कोळी, के. के. ठाकूर, महादेव कोळी, राम कोळी आणि इतर असे ३६ विद्यार्थी आणि लता खरे नावाची एकमेव विद्यार्थिनी होती.

आठवी-नववीला असताना खापे (जाधव) नावाचे शिक्षक मुख्याध्यापक म्हणून काम करत होते. दहावी-अकरावीला असताना एस. बी. पाटील सर, येवले सर, गांजाळे सर, माळवदे सर, जगताप सर, मोरे सर, कुलकर्णी सर असे एकापेक्षा एक श्रेष्ठ गुणवत्तेचे शिक्षक शिकवायला होते. प्रत्येकाची शिकवण्याची पद्धत निराळी होती, परंतु प्रत्येकाला विद्यार्थ्यांविषयी वाटणारा कळवळा मात्र सच्चा होता. ते विद्यार्थ्यांसाठी आकाशपाताळ एक करायला तयार असत. प्रचंड मेहनती आणि निष्ठावंत शिक्षकांच्या सहवासात हे दिवस सुरू होते. तो काळच भारावलेला होता. शिक्षकांना फारसा पगार नव्हता. तरीही त्यांनी शिकवण्यात आणि विद्यार्थ्यांना घडविण्यात कधी हयगय केली नाही. भगतसाहेबांनी गावातील वाण्याकडे त्यांना उधारी लावून दिली होती. त्यामुळे शाळेतील शिक्षक जेव्हा पगाराचे थोडेफार पैसे येत तेव्हा गावातील वाणी, दूधवाले यांचे पैसे भागवत. मी अकरावीला असताना एस. बी. पाटील सर मुख्याध्यापक होते. त्यावेळी अकरावीची मॅट्रिक फायनल म्हणजे बोर्डाची परीक्षा असायची. मी दिवसरात्र अभ्यास हा जणू काही ध्यास घेतला होता. कुटुंबाला शक्य होईल ती मदत करणे आणि उरलेला संपूर्ण वेळ अभ्यासासाठी वापरणे असा दिवसाचा क्रमच ठरवून घेतला होता. शिक्षकांचे मार्गदर्शन आत्मविश्वास वाढवत होतेच. अखेर अकरावीची परीक्षा झाली. अपेक्षेप्रमाणे उत्तम गुणांनी अकरावी उत्तीर्ण झालो.

शाळेचा निरोप घेण्याची वेळ आली होती. पुढच्या शिक्षणाचा विचार सुरू होता. आम्ही भांबावून गेलो होतो. मुख्याध्यापक एस. बी. पाटील सर मार्गदर्शन करत होते. माझ्या वडिलांना त्यांनी आवर्जून भेटायला बोलावले. पुढील शिक्षणासाठी मी साताऱ्याला जावे असा सल्ला त्यांनी दिला. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी उभ्या केलेल्या वटवृक्षाची महती त्यांनी वडिलांसमोर कथन केली. रयत शिक्षण संस्थेच्या कमवा आणि शिका योजनेबद्दल सांगितले. साताऱ्याच्या मातीबद्दल पाटील सरांना अभिमान होता. ते घाटमाथ्यावरचेच होते. पाटील सरांच्या सल्ल्यामुळे वडील आणि कुटुंबातील सर्वांनीच मला साताऱ्याला पाठवण्याचा निर्णय घेतला.

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** आणि यानंतरच आपले साताऱ्याशी आणि रयत शिक्षण संस्थेशी आयुष्यभराचे ऋणानुबंध प्रस्थापित झाले, बरोबर ना?

**ठाकूरसाहेब :** अगदी खरं आहे. माझ्या शिक्षकांनीच संस्थेबद्दल, कर्मवीर अण्णांबद्दल आणि छत्रपती शिवाजी कॉलेजबद्दल माझ्या मनात कमालीची उत्सुकता निर्माण केली होती. यापूर्वी मी माझ्या कुटुंबापासून इतका दूर कधीही गेलो नव्हतो, पण साताऱ्याला जाण्याचा निर्णय भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. माझ्या भागात तेव्हा कॉलेजेस नव्हती. शिक्षणासाठी पुणे किंवा मुंबईला जावे लागे. ते काही शक्य नव्हते. त्यामुळे साताऱ्याला आलो.

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** साहेब, कसे होते साताऱ्यातले दिवस?

**ठाकूरसाहेब :** छत्रपती शिवाजी कॉलेजचे दिवस मला खऱ्या अर्थाने घडवणारे ठरले. इथं मला जगण्याचं बळ मिळालं. कमवा आणि शिका योजनेचा मी विद्यार्थी झालो. अठरापगड जातीची मुलं आजूबाजूला होती. सगळ्यांशी मिळून मिसळून आनंदाने राहिलो. गरिबी होती, पण माणुसकीला कमतरता नव्हती. सुरुवातीचे थोडे दिवस कमवा आणि शिका योजनेत राहिल्यानंतर वडील आणि काकांनी मला पैसे पाठवायला सुरुवात केली. त्यावेळी फार तर ३० ते ४० रुपये खर्च येत असे. दरम्यान, मी गोडोली, सदरबाजार परिसरातदेखील राहायला होतो. याच काळात आज जी छत्रपती शिवाजी कॉलेजची मोठी दगडी इमारत आहे, तिचं काम सुरू झालं होतं. आम्ही तिथं काम



केलं आहे. साताऱ्यात मला खूप मित्र मिळाले. अतिशय अविस्मरणीय दिवस मी साताऱ्यात अनुभवले. एकाच खोलीत सतरंजी टाकून आम्ही आठ-नऊ जण झोपत असू. कष्टाची सवय पूर्वीपासून होतीच, आता त्या कष्टांचे महत्त्व अधोरेखित होत होते.

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** छत्रपती शिवाजी कॉलेजमधील आपल्याला शिकवणाऱ्या शिक्षकांच्या काही आठवणी सांगाल का?

**ठाकूरसाहेब :** अर्थात! अशा खूप आठवणी माझ्या काळजात साठवलेल्या आहेत. त्यावेळी आर. डी. गायकवाड सर आम्हाला शिकवायला होते. ते इतिहास शिकवत. त्यांचं शिकवणं विलक्षण होतं. इटलीचा इतिहास, फ्रेंच राज्यक्रांती, आधुनिक भारत असे त्यांनी शिकवलेले घटक मला आजही आठवतात. अक्षरशः आम्ही त्यांच्या शिकवण्यात रंगून जात असू.

प्राचार्य बापूसाहेब उनउने हे परोपकारी आणि संस्कारी शिक्षक मला इथे मिळाले. ते मराठी साहित्याचा इतिहास शिकवत. शिवाय संत साहित्यावर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. माणूस म्हणूनही ते खूप खूप मोठे होते, कारण त्या काळात चहुबाजूंनी आलेल्या बहुजन समाजातील गोरगरीब मुलांना कितीतरी अडचणी असायच्या. कोणाला साबणासाठी पैसे नसायचे. कुणाला फी भरण्यासाठी पैसे नसत. अनेकदा तेलासाठीसुद्धा पैसे नसायचे, पण उनउने सरांकडे जर गेलो ना तर ते कधीही कुणाला मोकळ्या हाताने माघारी पाठवत नसत. प्रचंड मदत त्यांनी विद्यार्थ्यांना केली. आमच्यासाठी ते फार मोठा आधार होते. त्यांच्याकडून मी 'देण्याचा' संस्कार शिकलो. याचदरम्यान भगरे सरदेखील आम्हाला शिकवायला होते. या सगळ्या शिक्षकांच्या तळमळीने शिकवण्यामुळे मला शिक्षणाविषयी प्रचंड गोडी निर्माण झाली. मला शिक्षक व्हावं असं वाटण्याचं कारणच 'रयत'मधील ध्येयवादी शिक्षक हे होतं. अकरावीला मला अतिशय चांगले मार्क मिळाले होते. मी साताऱ्याला आल्यानंतर गायकवाड सर मला म्हणालेदेखील तुम्ही सायन्सला का जात नाही. मी म्हटलं मला शिक्षक व्हायचं आहे. आपण चांगला शिक्षक व्हावं हेच मनावर बिंबलं होतं.

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** अच्छा! म्हणजे शिक्षक होणं हेच आपलं ध्येय होतं? पुढे तुम्ही शिक्षक म्हणून कामदेखील केलं, नाही का?

**ठाकूरसाहेब :** हो. मला हेही सांगायला पाहिजे की त्या काळात शिक्षकांना पगार नव्हते. होते ते वेळेत होत नसत. माझ्या विद्यार्थीदशेत मी शिक्षकांची वाण्याकडची बिले थकलेली पाहिली होती, पण तरीदेखील शिक्षक होण्याचाच अट्टाहास मनात होता.

पुढे मी पनवेल येथील व्ही.के. हायस्कूलला तीन वर्षे शिक्षक म्हणून काम केले, पण त्याच काळात औद्योगिक क्षेत्रात मोठे परिवर्तन होत होते. नवे उद्योग येऊ लागले होते. सिडकोची कामे सुरू झाली होती. आमच्या भागात भूमिपुत्रांच्या प्रश्नाखातर मोठी आंदोलने उभी राहिली होती. त्यामुळे विकासाची कामे रखडली गेली होती. मला वाटे विकास झाला पाहिजे. त्यातून माझा सिडकोशी संबंध आला. मी शिक्षक असल्यामुळे लोक माझे ऐकतील, त्यांना मी समजावून सांगेन असं अधिकाऱ्यांना वाटे. म्हणून त्यांनी मला गावाकडे नेलं. तिथे सिडकोचं छोटं ऑफिस सुरू झालं. त्यातून उद्योग व्यवसायाचा विकास होत गेला.

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** हो, मी त्या प्रश्नाकडे येणारच आहे. शिक्षकापासून उद्योजकापर्यंतचं आपल्या आयुष्यातलं स्थित्यंतर कसं झालं?

**ठाकूरसाहेब :** मी शिक्षक म्हणून नोकरी करत होतो, तेव्हा मला ३४२ रुपये पगार होता. सिडकोच्या लोकांनी माझ्याकडे मातीचा बंधारा बांधायचं काम दिलं. आम्ही पूर्वीपासून हे काम करत असल्यामुळे मला ते काम घेणं सहज शक्य होतं. ते काम दहा हजार रुपयांचं होतं. मी दोन-तीन महिन्यांतच ते पूर्ण केलं. त्या कामात मला तब्बल अडीच हजार रुपये नफा झाला. म्हणजे माझ्या शिक्षकी पगारापेक्षा ही रक्कम कित्येक पटीने जास्त होती. अशी सुरुवात झाली. मला नफा होत गेला, तसा मी हळूहळू हा नफा समाजात वाटू लागलो. अर्थात सुरुवातीला माझ्या सामाजिक कामाचं स्वरूप फार छोटं होतं. म्हणजे मी सुरुवातीच्या काळात विद्यार्थ्यांना वह्या वाटप करत असे. गरीब विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाचे कार्यक्रम घेई, पण मिळणारे पैसे आणि नफा हा आपल्या एकट्याचा नाही, तो समाजाचा आहे ही माझी पूर्वीपासूनची भावना होती. कदाचित तो संस्कार साताऱ्यात 'रयत'मध्ये माझ्यावर झाला होता.

याच काळातला आर.डी. गायकवाड सरांशी संबंधित एक प्रसंग मला आठवतो. सरांची बदली त्यावेळी कोकणात झाली होती. ते पनवेलला आले होते. आम्ही तेव्हा कॉलेजच्या नजीक असणाऱ्या आमच्या एका मित्राच्या हॉटेलवर जमून चहापाणी करत असू. त्यावेळी हाफ कटिंग चहा मला तिथे मिळे. माझ्या व्यावसायिक काळातले ते अगदी सुरुवातीचे दिवस होते. थोडीफार साधने मी घेतली होती. त्यातून व्यवसाय सुरू होता. मिळणाऱ्या पैशांतून समाजासाठी काही करत होतो. एक दिवस गायकवाड सर अचानक त्या हॉटेलमध्ये आले आणि त्यांनी विचारलं राम ठाकूर कोण आहे रे इकडे? आम्ही थोडे दचकलो. मग मी म्हटलं साहेब मीच आहे. तर ते म्हणाले, 'रयत'च्या छत्रपती शिवाजी कॉलेजचा विद्यार्थी ना तू? आता मोठा झालास. इकडे कॉलेजची इमारत बांधायची आहे, पैसे दे या कामाला आणि मग शैक्षणिक क्षेत्रात काही कामाला सुरुवात झाली.

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** अच्छा! म्हणजे पनवेल कॉलेजपासून आपल्या मदतीचा आणि प्रेमाचा वर्षाव रयत शिक्षण संस्थेवर सुरू झाला तर..

**ठाकूरसाहेब :** हो, बरोबर आहे. कारण त्यावेळी मी पनवेल कॉलेजमध्ये जनार्दन भगत पंत हॉल बांधला. ते साल १९८९चे होते. शरद पवारसाहेब त्यावेळी विरोधी पक्षनेते होते. उद्घाटनाला आम्ही त्यांना बोलावले. तेव्हा त्यांच्या भाषणात ते गमतीने म्हणाले, ''सासऱ्याला लुटणारे अनेक जावई मी पाहिले, पण सासऱ्याच्या नावाने वास्तू उभारणारे आज बघितले.''

थोरामोठ्यांचे असे आशीर्वाद मिळत गेले. आणखी एक प्रसंग असाच घडला. जनार्दन भगत पंत हॉलच्या उद्घाटनानंतर बरोबर सहा वर्षांनी १९९५ सालात पुन्हा आम्ही राज्यातील प्रमुख नेतेमंडळींना पनवेलला आमंत्रित करून नवीन बांधलेल्या वास्तूंचे उद्घाटन घेतले. लोकनेते शरदचंद्रजी पवारसाहेब, माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुलेसाहेब, तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी अशी सर्व नेतेमंडळी त्यावेळी उपस्थित होती. तेव्हा मनोहर जोशी म्हणाले होते, ''पनवेलला बघेल तिकडे सगळं राम ठाकूर यांनी करून घेतलं आहे. त्यांनी उभं केलेलं एवढं वैभव बघून आता त्यांना मुंबईला घेऊन जाण्याचा मोह मला होतोय.''

(पुढील मजकूर पान ४ वर..)

## संपादकीय

# राजकारण की राष्ट्रकारण?

देशभक्ती म्हणजे केवळ सीमारेषेवर प्राणांची आहुती देण्याची तयारी नव्हे. अशा काळात जबाबदारीने जगणे आणि दैनंदिन जीवनात राष्ट्राप्रती आपली कर्तव्ये पार पाडणेही तितकेच महत्त्वाचे असते.

**इराण-अमेरिका युद्धामुळे जगभर उद्भवलेल्या ऊर्जासंकटातून बचाव करण्यासाठी कोणताही देश ज्या उपाययोजनांचा अवलंब करतो, तेच उपाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना सुचविले. परकीय चलनाची गंगाजळी आटणार नाही याची काळजी घेण्यासाठी जनतेने हातभार लावावा असे आवाहन केले. प्रखर राष्ट्रकारणाच्या चष्म्यातून पाहिले, तर आताच्या परिस्थितीत पंतप्रधानांचे हे आवाहन कालसुसंगतच म्हणावे लागेल. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू, लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी आदी नेत्यांनीही अशा कसोटीच्या काळात अशाच उपायांचा अवलंब करून राष्ट्रीय ऐक्याचे दर्शन घडविण्याचे आवाहन केले होते, आणि जनतेनेही त्यास समंजस प्रतिसाद दिला होता. आजची स्थिती त्याहून फारशी वेगळी नाही. म्हणूनच, परकीय चलनाची बचत करण्यासाठी शक्य ते सर्व काही करण्याची वेळ आतादेखील आली आहे. गेल्या 28 फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या इराण युद्धामुळे तेलाच्या किमती झपाट्याने वाढल्या आहेत. युद्धाच्या सुरुवातीच्या आठवड्यांत इराणने आखाती प्रदेशातील तेल आणि वायू प्रकल्पांवर केलेल्या हल्ल्यांमुळे ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम झाला. मार्चच्या सुरुवातीपासून इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतून होणाऱ्या वाहतुकीवरही निर्बंध आणले. एप्रिलमध्ये अमेरिकेने इराणी बंदरांत ये-जा करणाऱ्या जहाजांवर नौदल नाकेबंदी जाहीर केली, आणि जागतिक तेल आणि वायू पुरवठ्यातील अडथळे आणखी वाढले. इंधनदर वाढल्यामुळे विमान कंपन्यांनी तिकिटांचे दर वाढवले आहेत. जगभरातील व्यापारात होणाऱ्या युरिया आणि इतर खते आखाती देशांतून होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे निर्यात केली जातात. या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. अशा कसोटीच्या काळात राजकारण करावयाचे की राष्ट्रकारणास सर्वोच्च प्राधान्य द्यावयाचे याचा विवेकी विचार जनतेने करावयास हवा. तथापि, आजचे चित्र काहीसे विचित्र आणि अनपेक्षितदेखील दिसते. मोदी यांचे आवाहन परिस्थितीशी सुसंगतच आहे, हे स्पष्ट असूनही, त्याची खिल्ली उडविणे म्हणजे, राष्ट्रकारणाच्या संस्कृतीलाच हिणविण्यासारखे ठरेल. गेल्या चार महिन्यांत भारताचा परकीय चलनसाठा सुमारे 1.12 टक्क्यांनी कमी झाला आहे. एप्रिल 2025 ते मार्च 2026 या आर्थिक वर्षात भारताने 123 अब्ज डॉलर किमतीचे कच्चे तेल आयात केले. भारताच्या आयात खर्चातील हा सर्वात मोठा हिस्सा आहे. 2025-26 या आर्थिक वर्षात भारतीयांनी 72 अब्ज डॉलर किमतीचे सोने आयात केले. 2023-24 मध्ये परदेशात जाणाऱ्या भारतीयांनी 31.7 अब्ज डॉलर खर्च केले. इमिग्रेशन ब्युरोच्या आकडेवारीनुसार, 2024 मध्ये सुमारे 30.9 दशलक्ष भारतीय नागरिकांनी परदेश प्रवास केला. 2023 मध्ये हा आकडा सुमारे 27.9 दशलक्ष होता. गेल्या वर्षी भारताने सुमारे 10 दशलक्ष टन युरिया आयात केला. सध्याच्या घडीला मात्र, खर्चाच्या या बाबी भारतासाठी चिंताजनक ठरल्या आहेत, तरीही तेल आणि खतांवरील खर्च कमी करणे सहज शक्य नाही. भारताची अर्थव्यवस्था चालवण्यासाठी ऊर्जा आयात अत्यावश्यक आहे, तर खते हा देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेसाठी आणि अन्नपुरवठ्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. कारण भारतातील निम्म्याहून अधिक कुटुंबे शेतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे प्रामुख्याने सोने खरेदी आणि परदेश प्रवासाचा खर्च कमी करणे हेच पर्याय उरतात. पंतप्रधानांच्या या आवाहनाचे राजकारण करण्यापेक्षा राष्ट्रहित नजरेसमोर ठेवून प्रतिसाद देण्यात अधिक समंजसपणा आहे. कारण राजकारण करण्यासाठी अनेक संधी सतत समोर येत असतात.**

# शुभमंगल! लग्नासाठी तहानलेला महाराष्ट्र

लग्नासाठी वाट पाहणाऱ्या मुलांचा प्रश्न आता समाजाचा झाला आहे. गावातल्या देवळासमोरच्या ओट्यावर संध्याकाळी जमणाऱ्या माणसांच्या गप्पा ऐका, लग्नकार्यात बसलेल्या पंगतीत कान द्या किंवा एसटीच्या खिडकीतून बाहेर पाहत असलेल्या एखाद्या वडिलांच्या डोळ्यात डोकावून बघा. एकच प्रश्न सारखा घुमतो आहे मुलाचं लग्न कधी करणार? आणि त्याच्या पुढचा प्रश्न त्याहून जड आहे मुलगी मिळतेय कुठे? महाराष्ट्राच्या अनेक गावात, खेड्यात, तालुक्यात आज २८ ते ३५ वयाच्या हजारो तरुणांची हीच अवस्था आहे. शिकले आहेत, शेती करतात, लहान-मोठी नोकरी करतात, घरदार आहे, पण घरात सून येत नाही. हा प्रश्न आता फक्त त्या घरापुरता राहिलेला नाही. त्याचे पडसाद संपूर्ण गावावर, समाजावर आणि येणाऱ्या पिढीवर उमटत आहेत.



हा प्रश्न अचानक निर्माण झालेला नाही. त्याची मुळं काही दशकांपूर्वी रुजली आहेत. त्या काळी मुलगा हवा ही मानसिकता इतकी खोलवर रुजलेली होती की मुलगी जन्माला आली की तोंड पाडायची प्रथा होती. गर्भलिंग निदान आणि कन्या भ्रूण हत्येच्या काळा बाजाराने ही तफावत आणखी वाढवली. आज त्या काळात जन्माला न आलेल्या मुलींची पोकळी जाणवते आहे. जनगणनेनुसार महाराष्ट्रात हजार मुलांमागे ९२९ मुली आहेत. पण ही सरासरी आहे. जिथे शेती हाच मुख्य व्यवसाय आहे, जिथे शिक्षणाचं प्रमाण कमी आहे, तिथे हे प्रमाण ८५० च्या खालीही गेलं आहे. म्हणजे दहा मुलांसाठी आठ मुलीही उपलब्ध नाहीत. पण फक्त संख्या कमी झाली म्हणून हा प्रश्न इतका गंभीर झाला आहे असं नाही. मुलींच्या आकांक्षा, त्यांचं शिक्षण, त्यांची स्वावलंबीता या सगळ्यांनी समीकरण बदलून टाकलं आहे. आजची मुलगी शिकते, कॉलेजला जाते, नोकरी करते, स्वतःच्या पायावर उभी राहते. तिला जोडीदार हवा असतो तो तिचा सन्मान करणारा, तिच्या स्वप्नांना समजून घेणारा, तिच्याबरोबर खांद्याला खांदा लावून चालणारा. तिला फक्त 'चांगला पगार असलेला मुलगा' नको असतो, तिला माणूस हवा असतो. यात चूक कोणाचीच नाही. मुलींनी प्रगती करावी हीच तर अपेक्षा होती. पण गावात राहणाऱ्या, शेती करणाऱ्या, महिन्याला पंधरा-वीस हजार कमावणाऱ्या मुलाला त्या निकषावर नाकारलं जातं. मुलीकडचे म्हणतात आमची मुलगी शहरात नोकरीला आहे, तिला गावात पाठवणार नाही. मुलाकडचे म्हणतात आमचा मुलगा शेतकरी आहे, त्याला साजेशी सून हवी. अशा दोन्ही बाजूंच्या अपेक्षांमध्ये लग्न अडकून पडतं. त्यात भर म्हणून स्थलांतरानेही मोठा फरक पाडला आहे. शिकलेली मुलं-मुली नोकरीसाठी मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरला जातात.

तिथे घरं करतात, संसार थाटतात. गावात मागे राहतात ते शेती करणारे आणि कमी शिकले तरुण. त्यांच्यासाठी पर्याय आणखी कमी होतात. गावातल्या मुलीही शिकून शहरात निघून जातात. मग उरतात ते प्रश्न आणि टोमणे. काही ठिकाणी अजूनही हुंड्याची प्रथा चालू आहे. मुलीकडचे मुलाच्या नोकरीचा हिशोब करतात, घर पाहतात, गाडी पाहतात. मुलाकडचेही मुलीचं रूप, शिक्षण, नोकरी बघतात. लग्न ही दोन कुटुंबांची भागीदारी झाली आहे, दोन माणसांचं नातं राहिलेलं नाही. जातीच्या बंधनांनीही पर्याय मर्यादित केले आहेत. आजही अनेक घरांत मुलगा-मुलगी जातीबाहेर लग्न करायला तयार असले तरी घरचे तयार नसतात. परिणाम काय होतो आहे? पहिला परिणाम होतो तो त्या तरुणाच्या मनावर. वयाच्या तिशीनंतरही लग्न न झालेला मुलगा घरात आणि गावात वेगळा पाहिला जातो. नातेवाईकांच्या टोमण्यांनी, शेजाऱ्यांच्या प्रश्नांनी तो आतून तुटतो. काहीजण नैराश्यात जातात, काही व्यसनाधीन होतात. काहीजण तर टोकाचं पाऊलही उचलतात. दुसरा परिणाम होतो तो गावावर. जिथे अविवाहित तरुणांची संख्या वाढते तिथे सामाजिक असंतुलन वाढतं. गुन्हेगारी वाढते, वाद वाढतात. विवाहसंस्था ही समाजाला बांधून ठेवणारी यंत्रणा आहे. ती डळमळीत झाली की समाजही सैल पडतो. तिसरा परिणाम होतो तो शेतीवर आणि अर्थव्यवस्थेवर. शेती करणाऱ्या घरात मुलगा लग्न करून गृहस्थाश्रमात आला नाही की शेती सांभाळायला माणूस उरत नाही. आई-वडील म्हातारे होतात, शेती परडीवर येते. मुलगा शहरात निघून जातो, गाव ओस पडतं. या प्रश्नावर उपाय काय? हा प्रश्न एका रात्रीत सुटणार नाही, पण प्रयत्न केले नाहीत तर तो अधिकच बिकट होईल. सगळ्यात आधी मुलीच्या जन्माला साजरा करायला शिकायला हवं. मुलगी म्हणजे ओझं नाही, ती घराची भरभराट आहे ही भावना घराघरात रुजवावी लागेल. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' ही फक्त शासनाची घोषणा राहता कामा नये. प्रत्येक कुटुंबाने ती आपली जबाबदारी मानली पाहिजे. मुलगी जन्माला आली की फटाके फुटले पाहिजेत, तोंड पाडता कामा नये. दुसरं म्हणजे अपेक्षा वास्तवाच्या जवळ आणाव्या लागतील. मुलीकडच्यांनी मुलाच्या बँक बॅलन्सपेक्षा त्याचा स्वभाव पाहावा. मुलाकडच्यांनी मुलीच्या पगारापेक्षा तिचा समजूतदारपणा पाहावा. सरकारी नोकरी, फ्लॅट, गाडी या गोष्टी सुख देतात, पण शांती देत नाहीत. शांती देते ती समजूतदार साथ. तिसरं म्हणजे जातीच्या भिंती ओलांडाव्या लागतील. आंतरजातीय लग्नाला समाजाने स्वीकारलं पाहिजे. महाराष्ट्राने संतांची, समाजसुधारकांची भूमी आहे. त्यांचा वारसा आपण पुढे नेला पाहिजे. दोन माणसं एकमेकांना समजून घेतात, एकमेकांचा आदर करतात, तिथे जात येते कुठे? शेतीला आणि ग्रामीण व्यवसायाला प्रतिष्ठा द्यावी लागेल. शेतकरी म्हणजे मागासलेला नाही. आज ड्रोनने फवारणी करणारा, सेंद्रिय शेती करणारा, प्रक्रिया उद्योग उभा करणारा शेतकरी महिन्याला लाखभर कमावतो आहे. त्याला समाजात मान मिळाला पाहिजे. शेती करणारा मुलगा 'नको' आहे ही मानसिकता बदलली पाहिजे. विवाह मेळाव्यांसारखे व्यासपीठ उभे करावे लागतील. पण ते पारदर्शक हवेत. मुला-मुलींची खोटी माहिती देऊन फसवणूक करणारे मेळावे नकोत.

जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर नोंदणीकृत संस्था अशा मेळाव्यांचं आयोजन करतील तर विश्वास वाढेल. मानसिक आरोग्याकडे लक्ष द्यावं लागेल. लग्न जुळत नाही म्हणून नैराश्यात जाणाऱ्या तरुणांसाठी समुपदेशनाची व्यवस्था हवी. गावपातळीवर याबद्दल मोकळेपणाने बोललं पाहिजे. लग्न झालं नाही तरी आयुष्य संपत नाही, हा संदेश पोहोचवला पाहिजे. शेवटी एक गोष्ट समजून घ्यायला हवी लग्न हा आयुष्याचा एक भाग आहे, संपूर्ण आयुष्य नाही. काही लोकांना लग्न करायचंच नसतं, काहींना उशिरा जमतं, काहींचं नशिबातच नसतं. त्यांना समाजाने वेगळं पाहू नये. त्यांचा आदर करायला शिकायला हवं. गावातल्या प्रत्येक घरात पुन्हा लग्नाची शहनाई वाजावी आणि प्रत्येक तरुणाला त्याचा जोडीदार मिळावा, हीच अपेक्षा.

**(साभार : इंटरनेट)**

# कठोर संघर्ष आणि प्रामाणिक प्रयत्नांमुळे आयुष्य घडवता आले : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर

(पान ३ वरून)

▶ **प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** खूप सुंदर प्रसंग आहे हा. इतकं भरभरून काम करणाऱ्या माणसाला आपल्याकडे ओढण्यासाठी स्पर्धा असणारच, पण पनवेल कॉलेजच्या रूपाने 'रयत'वर सुरू झालेला आपल्या प्रेमाचा वर्षाव आजही अखंड सुरू आहे. आजवर आपण ११५ कोटींपेक्षा जास्त रक्कम रयत शिक्षण संस्थेला दिली आहे.

▶ **ठाकूरसाहेब :** तसं नाही. मी किती रक्कम दिली हे कधी मोजलं नाही. मी देतो म्हणजे काय? हे सगळं समाजाचं आहे अशी माझी भावना आहे. माझ्या व्यक्तिगत समाधानाचा तो भाग आहे. देण्याचा संस्कार संस्थेनेच शिकवला आहे. कर्मवीर अण्णांची प्रेरणा, उनउने सरांच्यासारख्या शिक्षकांचे संस्कार आहेत.

आज मी जे कमवतो त्याच्यापैकी २० ते २५ टक्के रक्कम समाजाची समाजाला देऊन टाकतो. पूर्वी काहीच नव्हतं. आज आहे. मग देताना आढेवेढे कशासाठी? आपले व्यावसायिक कंपन्यांमध्ये मी ३० टक्के व माझी पत्नी २० टक्के शेअर होल्डर आहोत. कंपनीला नफा झाला की त्याचे पैसे आम्हाला मिळतात. तीच रक्कम मी समाजासाठी देतो.

▶ **प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** तुमच्या दानधर्माबद्दल जास्त बोललेलं तुम्हाला आवडत नाही, हे मी जाणतो, पण तरीही आधुनिक काळातल्या कर्णाचं रूप आम्हाला तुमच्यात दिसतं. म्हणजे मलाही एक प्रसंग आठवतो. आता मी माझ्या कॉलेजच्या नव्या इमारतीचं बांधकाम काढलं. मी सहज आपल्याला बोललो, तर तुम्ही लगेच २० लाख रुपये देणगी द्यायचं कबूल केलं. पुन्हा थोड्या वेळात मला बोलावून आणखी २० लाख रुपये देतो असं सांगितलं. म्हणजे काही क्षणात ४० लाखांची रक्कम तुम्ही देऊ केलीत.

अजून एक प्रसंग आठवतो. तेव्हा मी छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये मराठी विभागप्रमुख होतो. प्राचार्य डॉ. गणेश ठाकूरसाहेबांचा एक दिवस मला अचानक फोन आला. आपण कॉलेजला भेट द्यायला येत आहात, तातडीने तुम्ही कॉलेजवर जा. त्यानंतर मी लगेचच कॉलेजवर येऊन आपल्याला संपूर्ण कॉलेज फिरून दाखवू लागलो. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राजवळ आल्यानंतर तुम्ही पटकन म्हणालात, या सेंटरला मला १० लाख रुपये द्यायचे आहेत. पुन्हा काही जुन्या इमारती तुम्ही पाहिल्या, देणगीची रक्कम वाढवलीत. आकडा ४० लाखांपर्यंत गेला. शेवटी कॉलेजला हवे असलेल्या



बहुतेक सुविधा लक्षात घेऊन तुम्ही फेरफटका पूर्ण होईपर्यंत म्हणालात, ''हे सगळंच नवंजुनं बांधून घ्या. काय रक्कम होईल ती मी देतो.'' साहेब त्यावेळी आपण १० लाखांपासून सुरुवात केली होती, आठ कोटींपर्यंत आपले देणगीचा आकडा त्या एका फेरफटक्यात गेला. त्यामुळे आम्ही सगळेच भारावून गेलो. आज छत्रपती शिवाजी कॉलेजला जे वैभव प्राप्त झालं आहे, त्याचं कारण तुमचे दातृत्व हे आहे.

▶ **ठाकूरसाहेब :** मी जबाबदारी समजतो. माझ्यावर असणारी समाजाची जबाबदारी. अनेकदा असं होतं, देणग्या दिल्या की आपले लोक माझं नाव देण्यासाठी आग्रह करतात. मला व्यक्तिशः ते आवडत नाही, पण मग लोकाग्रहास्तव एखाद्या ठिकाणी माझं नाव दिलं गेलं तर मात्र माझ्यावर एक काम पूर्ण करण्याची जबाबदारी येते. मग ते पूर्ण होईपर्यंत मी कुठल्याही खर्चाकडे पाहत नाही. रयत शिक्षण संस्थेमध्ये तर अजिबातच पाहत नाही.

▶ **प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** साहेब, 'रयत'चं नाव आपल्या प्रत्येक उत्तरात येतंय. अर्थात 'रयत' आपल्या जगण्याचा विभाज्य भाग आहे, पण 'रयत'शी प्रशासकीय पातळीवर आपण कसे जोडला गेलात हे जाणून घ्यायला आवडेल.

▶ **ठाकूरसाहेब :** 'रयत'शी जोडला गेलो म्हणजे एकतर मी सगळं शिक्षण 'रयत'मध्ये केलं. साताऱ्याला आलो. त्यामुळे भावनिक बंध निर्माण झाले होतेच. त्यात पुढे माझे सासरे जनार्दन भगतसाहेब यांचे प्रशासकीय यंत्रणेशी संबंध होते. एन.डी. पाटीलसाहेब व इतर पदाधिकाऱ्यांच्या बरोबर कोकणात रयत वाढवण्यासाठी त्यांनी काम केले होते. ते संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य होते. ९ मेचा कार्यक्रम असेल किंवा २२ सप्टेंबरचा. ते न चुकता साताऱ्याला येत.

मीदेखील १९८७ वगैरेपासून या कार्यक्रमांना न चुकता अखंडपणे येत आलो आहे. प्रशासकीय पातळीवर ९०च्या सुमाराला मी काम करायला लागलो. संस्थेच्या रायगड विभाग कमिटीत मी पहिल्यांदा काम सुरू केले. त्या कमिटीचे चेअरमनपद सहा वर्षे मी सांभाळले. दरम्यान, लोकनेते दि.बा. पाटील, भगतसाहेब ही मंडळी वृद्धापकाळामुळे मॅनेजिंग कौन्सिलमधून निवृत्त झाली. त्यानंतर मी मॅनेजिंग कौन्सिलचा सदस्य म्हणून काम पाहू लागलो.

▶ **प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य आणि विविध महाविद्यालयांच्या विकास समितीचे अध्यक्ष म्हणून आपण केलेले काम आम्ही पाहिले आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांविषयी असणारी प्रचंड आस्था आणि तळमळ त्यात आम्हाला जाणवत आली आहे. आपण आर्थिक पातळीवर संस्थेच्या पाठीमागे उभे राहिलात, पण प्रशासकीय पातळीवरदेखील आपण खूप मोलाची मदत केली आहे.

▶ **ठाकूरसाहेब :** माझा हातून काही कामं होत गेली, असं म्हणता येईल. माझ्याकडे काही आहे म्हणून ते देऊ शकलो. राजकारणातही काही यश मिळत गेलं. त्यामुळे प्रशासकीय पातळीवर संस्थेसाठी काही प्रश्न सोडविण्यात सहभाग घेता आला. मागे डॉ. अनिल पाटील चेअरमन असताना जीएसटीशी संबंधित एक महत्त्वाचा विषय घेऊन आम्ही देवेंद्र फडणवीससाहेबांकडेसुद्धा गेलो होतो.

**प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** साहेब आणखी एक प्रश्न आपल्याला विचारावासा वाटतो, 'रयत'च्या कामाबरोबर आपण शिक्षण क्षेत्रात आणखीही काही काम उभे केले. म्हणजे शिक्षण संस्था म्हणा किंवा कॉलेजेस म्हणा. काय सांगाल त्याबद्दल?

▶ **ठाकूरसाहेब :** हे खरं आहे. संस्थेच्या कामाबरोबर मी स्वतः जनार्दन आत्माराम भगत शिक्षण संस्था काढली. ती काढण्याचं कारण हे की मला 'रयत'बरोबर काम करता करता स्वतंत्रपणे काही करता येईल. स्पष्टच सांगायचं झालं तर एखादा चांगला शिक्षक आपल्याकडे घ्यायचा असेल किंवा एखाद्या शिक्षकाची बदली करायची असेल, तर आम्हाला साताऱ्याला फेऱ्या माराव्या लागतात. निर्णय प्रक्रिया कठीण होऊन जाते. कुठल्याही मंजुरीसाठी साताऱ्याला यावे लागते. त्यामुळे ही संस्था काढली, पण काहीही असलं तरी आमची मातृसंस्था एकच आहे, रयत शिक्षण संस्था! आणि मी 'रयत'मध्ये आणि या संस्थेत कधीही फरक केला नाही. मातृसंस्थेचे महत्त्व माझ्यालेखी खूप आहे. साताऱ्याच्या वटवृक्षाची एक मुळी मी इकडे घेऊन आलो आणि इथे लावली असंच म्हणता येईल.

▶ **प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** अगदी खरं आहे. आपल्या कामाचा इतका प्रचंड व्याप सांभाळून आपण 'रयत'कडे बारकाईने लक्ष देत आला आहात. साहेब, आपल्या संस्थेचं काम कसं चालतं?

▶ **ठाकूरसाहेब :** आमच्या संस्थेचं चांगू काना ठाकूर (सीकेटी) कॉलेज स्थापनेपासूनच नॅक मूल्यांकनात ए प्लस प्लस आहे. सुरुवातीलाच ते ऑटोनॉमसदेखील झालं. मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ते एक महत्त्वाचं महाविद्यालय म्हणून ओळखलं जातं. इतकंच नव्हे तर आम्ही सुरू केलेले लॉ मुंबई विद्यापीठात सर्वत्र नावारूपास आलं आहे.

तीन वर्षांची पदवी, पाच वर्षांचा एलएलबी प्रोग्रॅम, एलएलएम सगळं आपण उपलब्ध करून दिलं आहे. शासनाच्या नियमानुसार प्रवेश मर्यादा असल्यामुळे दरवर्षी असंख्य विद्यार्थ्यांना माघारी जावं लागतं. प्रवेशासाठी मोठी स्पर्धा असते. आमच्या संस्थेकडून सीबीएससी स्कूलदेखील चालवली जातात. अलीकडेच 'माझी शाळा सुंदर शाळा' या शासनाच्या उपक्रमाचे २१ लाख रुपयांचे पारितोषिक आमच्या शाळेला मिळालं आहे. गुणवत्तेचा आग्रह आपल्याला इथपर्यंत घेऊन आला आहे.

मध्यंतरी मी मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना एका कार्यक्रमासाठी आमंत्रित केले होते. ते म्हणाले , ''आपली कॉलेजेस इतकी चांगली आहेत की आपण त्याची युनिव्हर्सिटी करायला हवी.''

पण तरीही मी एक गोष्ट सांगतो. माझी संस्था आणि 'रयत' मी कधीही वेगळी मानली नाही. इथून पुढेही मानणार नाही. अहो! मोखाड्याच्या कॉलेजची जबाबदारी माझ्यावर संस्थेने दिली. आदिवासी भागातले ते कॉलेज. सोयीसुविधांची वानवा होती. आम्ही ते संपूर्ण महाविद्यालय नव्याने उभं केलं. आदिवासी भागातील मुलांच्या शिक्षणाची चांगली सोय करण्यावर भर दिला. सगळ्या सोयी उपलब्ध करून दिल्या. आज तिथली परिस्थिती पूर्ण बदलली आहे. तिथेही नाव देण्याचा प्रश्न आला. मी तिथे काम केलं म्हणून आपल्या भगीरथकाकांनी शरद पवारसाहेबांना सांगितलं, यांचं नाव द्यायला पाहिजे. माझा विरोध होता, पण त्यांनी ऐकलं नाही. नावात काहीच नसतं. आपलं योगदान महत्त्वाचं!

▶ **प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** साहेब आपल्याबरोबरच्या या गप्पा कधीच संपू नयेत असं वाटतं. इतका विस्तृत पट आपल्या कार्यकर्तृत्वाचा आहे, पण या मुलाखतीच्या शेवटाकडे येताना विचारावंसं वाटतं की, आयुष्याच्या या टप्प्यावर जीवनाकडे बघताना काय वाटतं आपल्याला?

▶ **ठाकूरसाहेब :** खरंतर आपण स्वतः काय असतो? आपला देश, आपली मातृभूमी, आपल्या आई-वडील यांच्याकडून हे सगळं मिळत असतं. आपण कोण? ना जन्म आपल्या हातात असतो ना मृत्यू! केवळ जन्म आणि मृत्यू या दोन्हीच्या मधलं पान आपल्या हातात असतं. ते पान भरायची जबाबदारी आपली असते. देव आहे का नाही, हे मला माहिती नाही, पण आपण चांगलं काम करत राहिलो की चांगल्या गोष्टी होत राहतात याचा अनुभव मात्र मी घेतला आहे. मघाशी म्हटलं तसं संत-महात्म्यांची शिकवण, कर्मवीर अण्णांसारख्या थोर पुरुषांच्या आदर्शावर पुढे चाललं पाहिजे.

▶ **प्राचार्य डॉ. मेनकुदळे :** साहेब, ही मुलाखत म्हणजे आम्हाला समृद्ध करणारा एक विचारांचा ठेवा आहे. आपल्या कार्यकर्तृत्वाला सलाम करावासा वाटतो. आपला हा प्रवास केवळ आणि केवळ थक्क करणारा आहे. आपल्याबरोबरच आपले दोन्ही चिरंजीव आपण घालून दिलेल्या मार्गाने पुढे जात आहेत. आपल्या परिवाराच्या पुढील कार्यासाठी आम्ही खूप खूप शुभेच्छा देतो. या मुलाखतीसाठी आपण वेळ दिलात त्याबद्दलही मनःपूर्वक आभार!

# खुली ई-निविदा सूचना

## ग्रुप ग्रामपंचायत वडगाव खालापूर

**सूचना क्रमांक : सन 2026-2027**

ग्रुप ग्रामपंचायत वडगाव तालुका खालापूर जिल्हा रायगड यांचेकडील ग्रामपंचायत फंड विकास कामा अंतर्गत खालिल कामाची योग्य त्या पुरवठादाराकडून **२०२६-२०२७** या आर्थिक वर्षाकरिता Item wise Rate Tender online निविदा मागवण्यात येत आहे.

सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून online पध्दतीने मंगणक प्रणालीवर प्रसिध्द होईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची निविदा फी (ना परताचा) gst करासहित | १% इसारा / बयाना रक्कम रुपये | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Provide Plumbing Material at Grampanchayat vadgaon Tal Khalapur Dist Raigad | | ११८ | १०००० | पुरवठादार |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे:**

1. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा, नोटीस, सुचना, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
2. वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिध्दी | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा फॉर्म व परिशीष्ट मिळवण्याचा कालावधी (डाउनलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी (अपलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांक: [ १९.०५.२०२६] सायंकाळी ५.०० मी. | | | |

3. सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वीकारली जाणार नाहीत. ती स्कॅन करून ऑनलाईन सादर करावी.
4. सदरील कोरी निविदा फी (Tender Fee) व इसारा अनामत रक्कम (EMD) NEFT व्दारे ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.
5. निविदा दर हे Item wise rate ने भरावयाचे आहे.
6. Registration ऑनलाईन सदर करावे.
7. Pancard कॉपी ऑनलाईन सदर करावी.
8. Adhar card कॉपी ऑनलाईन सदर करावी
9. Income tax परतावा ऑनलाईन सदर करावी.
10. GST प्रत online सदर करावी.
11. Gst भरणा चलन पावती सादर करावी.
12. प्रतिज्ञापत्रक (DECLARATION 100 bond) online सादर करावे.
13. शासकीय तसेच निमशासकीय व महामंडळ यांच्या काळ्या यादीत नसल्याचे घोषणा पत्र सादर करावे.
14. Online मागवलेल्या कागदपत्रावर निविदा धारकाची Digital Signature असणे आवश्यक आहे. नसल्यास अश्या निविदाधारकास निविदेत सहभाग घेता येणार नाही.
15. सदर निविदा प्रक्रीयेसाठी किमान 3 निविदाधारक आवश्यक आहेत. कमीत कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या कंत्राटदारास काम देण्याचा विचार केला जाईल.
16. कोणतेही कारण न दाखवता निविदा नाकारण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार प्रसिध्दीधारकाने राखून ठेवला आहे.
17. करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अश्या अधिकाऱ्याा समोर करून द्यावा लागेल.
18. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारे साहित्य पुरवठा होणार नाही.
19. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच संबधित ठेकेदाराची नोंदणी ज्या विभागाची आहे त्या विभागास नोंदणी काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.
20. निविदे बाबत काही वाद उद्भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत वडगाव निर्णय घेईल तो निर्णय निविदा धारकास बंधनकारक राहील.
21. मागवलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहील.

**सही/-**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

**सही/-**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**


# खुली ई-निविदा सूचना

## ग्रुप ग्रामपंचायत वडगाव खालापूर

**सूचना क्रमांक : सन 2026-2027**

ग्रुप ग्रामपंचायत वडगाव तालुका खालापूर जिल्हा रायगड यांचेकडील ग्रामपंचायत फंड विकास कामा अंतर्गत खालिल कामाची योग्य त्या पुरवठादाराकडून **२०२६-२०२७** या आर्थिक वर्षाकरिता Item wise Rate Tender online निविदा मागवण्यात येत आहे.

सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून online पध्दतीने मंगणक प्रणालीवर प्रसिध्द होईल.


| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची निविदा फी (ना परताचा) gst करासहित | १% इसारा / बयाना रक्कम रुपये | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Provide Electric Material at Grampanchayat vadgaon Tal Khalapur Dist Raigad | | ११८ | १०००० | पुरवठादार |


**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे:**

1. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा, नोटीस, सुचना, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
2. वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिध्दी | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा फॉर्म व परिशीष्ट मिळवण्याचा कालावधी (डाउनलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी (अपलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांक: [ १९.०५.२०२६] सायंकाळी ५.०० मी. | | | |

3. सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वीकारली जाणार नाहीत. ती स्कॅन करून ऑनलाईन सादर करावी.
4. सदरील कोरी निविदा फी (Tender Fee) व इसारा अनामत रक्कम (EMD) NEFT व्दारे ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.
5. निविदा दर हे Item wise rate ने भरावयाचे आहे.
6. Registration ऑनलाईन सदर करावे.
7. Pancard कॉपी ऑनलाईन सदर करावी.
8. Adhar card कॉपी ऑनलाईन सदर करावी
9. Income tax परतावा ऑनलाईन सदर करावी.
10. GST प्रत online सदर करावी.
11. Gst भरणा चलन पावती सादर करावी.
12. प्रतिज्ञापत्रक (DECLARATION 100 bond) online सादर करावे.
13. शासकीय तसेच निमशासकीय व महामंडळ यांच्या काळ्या यादीत नसल्याचे घोषणा पत्र सादर करावे.
14. Online मागवलेल्या कागदपत्रावर निविदा धारकाची Digital Signature असणे आवश्यक आहे. नसल्यास अश्या निविदाधारकास निविदेत सहभाग घेता येणार नाही.
15. सदर निविदा प्रक्रीयेसाठी किमान 3 निविदाधारक आवश्यक आहेत. कमीत कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या कंत्राटदारास काम देण्याचा विचार केला जाईल.
16. कोणतेही कारण न दाखवता निविदा नाकारण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार प्रसिध्दीधारकाने राखून ठेवला आहे.
17. करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अश्या अधिकाऱ्याा समोर करून द्यावा लागेल.
18. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारे साहित्य पुरवठा होणार नाही.
19. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच संबधित ठेकेदाराची नोंदणी ज्या विभागाची आहे त्या विभागास नोंदणी काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.
20. निविदे बाबत काही वाद उद्भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत वडगाव निर्णय घेईल तो निर्णय निविदा धारकास बंधनकारक राहील.
21. मागवलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहील.

**सही/-**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

**सही/-**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

# खुली ई-निविदा सूचना

## ग्रुप ग्रामपंचायत वडगाव खालापूर

**सूचना क्रमांक : सन 2026-2027**

ग्रुप ग्रामपंचायत वडगाव तालुका खालापूर जिल्हा रायगड यांचेकडील ग्रामपंचायत फंड विकास कामा अंतर्गत खालिल कामाची योग्य त्या पुरवठादाराकडून **२०२६-२०२७** या आर्थिक वर्षाकरिता Item wise Rate Tender online निविदा मागवण्यात येत आहे.

सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून online पध्दतीने मंगणक प्रणालीवर प्रसिध्द होईल.


| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची निविदा फी (ना परताचा) gst करासहित | १% इसारा / बयाना रक्कम रुपये | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Provide Stationery at Grampanchayat vadgaav Tal Khalapur Dist Raigad | | ११८ | १०००० | पुरवठादार |


**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे:**

1. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा, नोटीस, सुचना, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
2. वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिध्दी | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा फॉर्म व परिशीष्ट मिळवण्याचा कालावधी (डाउनलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी (अपलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांक: [ १९.०५.२०२६] सायंकाळी ५.०० मी. | | | |

3. सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वीकारली जाणार नाहीत. ती स्कॅन करून ऑनलाईन सादर करावी.
4. सदरील कोरी निविदा फी (Tender Fee) व इसारा अनामत रक्कम (EMD) NEFT व्दारे ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.
5. निविदा दर हे Item wise rate ने भरावयाचे आहे.
6. Registration ऑनलाईन सदर करावे.
7. Pancard कॉपी ऑनलाईन सदर करावी.
8. Adhar card कॉपी ऑनलाईन सदर करावी
9. Income tax परतावा ऑनलाईन सदर करावी.
10. GST प्रत online सदर करावी.
11. Gst भरणा चलन पावती सादर करावी.
12. प्रतिज्ञापत्रक (DECLARATION 100 bond) online सादर करावे.
13. शासकीय तसेच निमशासकीय व महामंडळ यांच्या काळ्या यादीत नसल्याचे घोषणा पत्र सादर करावे.
14. Online मागवलेल्या कागदपत्रावर निविदा धारकाची Digital Signature असणे आवश्यक आहे. नसल्यास अश्या निविदाधारकास निविदेत सहभाग घेता येणार नाही.
15. सदर निविदा प्रक्रीयेसाठी किमान 3 निविदाधारक आवश्यक आहेत. कमीत कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या कंत्राटदारास काम देण्याचा विचार केला जाईल.
16. कोणतेही कारण न दाखवता निविदा नाकारण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार प्रसिध्दीधारकाने राखून ठेवला आहे.
17. करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अश्या अधिकाऱ्याा समोर करून द्यावा लागेल.
18. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारे साहित्य पुरवठा होणार नाही.
19. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच संबधित ठेकेदाराची नोंदणी ज्या विभागाची आहे त्या विभागास नोंदणी काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.
20. निविदे बाबत काही वाद उद्भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत वडगाव निर्णय घेईल तो निर्णय निविदा धारकास बंधनकारक राहील.
21. मागवलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहील.

**सही/-**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

**सही/-**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

# खुली ई-निविदा सूचना

## ग्रुप ग्रामपंचायत वडगाव खालापूर

**सूचना क्रमांक : सन 2026-2027**

ग्रुप ग्रामपंचायत वडगाव तालुका खालापूर जिल्हा रायगड यांचेकडील ग्रामपंचायत फंड विकास कामा अंतर्गत खालिल कामाची योग्य त्या पुरवठादाराकडून **२०२६-२०२७** या आर्थिक वर्षाकरिता Item wise Rate Tender online निविदा मागवण्यात येत आहे.

सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून online पध्दतीने मंगणक प्रणालीवर प्रसिध्द होईल.


| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची निविदा फी (ना परताचा) gst करासहित | १% इसारा / बयाना रक्कम रुपये | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Provide Lime Powder at Grampanchayat vadgaav Tal Khalapur Dist Raigad | | ११८ | १०००० | पुरवठादार |


**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे:**

1. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा, नोटीस, सुचना, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
2. वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिध्दी | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा फॉर्म व परिशीष्ट मिळवण्याचा कालावधी (डाउनलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी (अपलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांक: [ १९.०५.२०२६] सायंकाळी ५.०० मी. | | | |

3. सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वीकारली जाणार नाहीत. ती स्कॅन करून ऑनलाईन सादर करावी.
4. सदरील कोरी निविदा फी (Tender Fee) व इसारा अनामत रक्कम (EMD) NEFT व्दारे ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.
5. निविदा दर हे Item wise rate ने भरावयाचे आहे.
6. Registration ऑनलाईन सदर करावे.
7. Pancard कॉपी ऑनलाईन सदर करावी.
8. Adhar card कॉपी ऑनलाईन सदर करावी
9. Income tax परतावा ऑनलाईन सदर करावी.
10. GST प्रत online सदर करावी.
11. Gst भरणा चलन पावती सादर करावी.
12. प्रतिज्ञापत्रक (DECLARATION 100 bond) online सादर करावे.
13. शासकीय तसेच निमशासकीय व महामंडळ यांच्या काळ्या यादीत नसल्याचे घोषणा पत्र सादर करावे.
14. Online मागवलेल्या कागदपत्रावर निविदा धारकाची Digital Signature असणे आवश्यक आहे. नसल्यास अश्या निविदाधारकास निविदेत सहभाग घेता येणार नाही.
15. सदर निविदा प्रक्रीयेसाठी किमान 3 निविदाधारक आवश्यक आहेत. कमीत कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या कंत्राटदारास काम देण्याचा विचार केला जाईल.
16. कोणतेही कारण न दाखवता निविदा नाकारण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार प्रसिध्दीधारकाने राखून ठेवला आहे.
17. करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अश्या अधिकाऱ्याा समोर करून द्यावा लागेल.
18. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारे साहित्य पुरवठा होणार नाही.
19. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच संबधित ठेकेदाराची नोंदणी ज्या विभागाची आहे त्या विभागास नोंदणी काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.
20. निविदे बाबत काही वाद उद्भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत वडगाव निर्णय घेईल तो निर्णय निविदा धारकास बंधनकारक राहील.
21. मागवलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहील.

**सही/-**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

**सही/-**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

# खुली ई-निविदा सूचना

## ग्रुप ग्रामपंचायत वडगाव खालापूर

**सूचना क्रमांक : सन 2026-2027**

ग्रुप ग्रामपंचायत वडगाव तालुका खालापूर जिल्हा रायगड यांचेकडील ग्रामपंचायत फंड विकास कामा अंतर्गत खालिल कामाची योग्य त्या पुरवठादाराकडून **२०२६-२०२७** या आर्थिक वर्षाकरिता Item wise Rate Tender online निविदा मागवण्यात येत आहे.

सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून online पध्दतीने मंगणक प्रणालीवर प्रसिध्द होईल.


| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची निविदा फी (ना परताचा) gst करासहित | १% इसारा / बयाना रक्कम रुपये | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Provide JCB, HYDRA, TRACTOR TROLLY, WATER TANKAR SERVICE (as per requirement) at Grampanchayat vadgaon Tal Khalapur Dist Raigad | | ११८ | १०००० | पुरवठादार |


**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे:**

1. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा, नोटीस, सुचना, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
2. वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिध्दी | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा फॉर्म व परिशीष्ट मिळवण्याचा कालावधी (डाउनलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी (अपलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांक: [ १९.०५.२०२६] सायंकाळी ५.०० मी. | | | |

3. सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वीकारली जाणार नाहीत. ती स्कॅन करून ऑनलाईन सादर करावी.
4. सदरील कोरी निविदा फी (Tender Fee) व इसारा अनामत रक्कम (EMD) NEFT व्दारे ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.
5. निविदा दर हे Item wise rate ने भरावयाचे आहे.
6. Registration ऑनलाईन सदर करावे.
7. Pancard कॉपी ऑनलाईन सदर करावी.
8. Adhar card कॉपी ऑनलाईन सदर करावी
9. Income tax परतावा ऑनलाईन सदर करावी.
10. GST प्रत online सदर करावी.
11. Gst भरणा चलन पावती सादर करावी.
12. प्रतिज्ञापत्रक (DECLARATION 100 bond) online सादर करावे.
13. शासकीय तसेच निमशासकीय व महामंडळ यांच्या काळ्या यादीत नसल्याचे घोषणा पत्र सादर करावे.
14. Online मागवलेल्या कागदपत्रावर निविदा धारकाची Digital Signature असणे आवश्यक आहे. नसल्यास अश्या निविदाधारकास निविदेत सहभाग घेता येणार नाही.
15. सदर निविदा प्रक्रीयेसाठी किमान 3 निविदाधारक आवश्यक आहेत. कमीत कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या कंत्राटदारास काम देण्याचा विचार केला जाईल.
16. कोणतेही कारण न दाखवता निविदा नाकारण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार प्रसिध्दीधारकाने राखून ठेवला आहे.
17. करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अश्या अधिकाऱ्याा समोर करून द्यावा लागेल.
18. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारे साहित्य पुरवठा होणार नाही.
19. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच संबधित ठेकेदाराची नोंदणी ज्या विभागाची आहे त्या विभागास नोंदणी काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.
20. निविदे बाबत काही वाद उद्भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत वडगाव निर्णय घेईल तो निर्णय निविदा धारकास बंधनकारक राहील.
21. मागवलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहील.

**सही/-**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

**सही/-**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

# खुली ई-निविदा सूचना

## ग्रुप ग्रामपंचायत वडगाव खालापूर

**सूचना क्रमांक : सन 2026-2027**

ग्रुप ग्रामपंचायत वडगाव तालुका खालापूर जिल्हा रायगड यांचेकडील ग्रामपंचायत फंड विकास कामा अंतर्गत खालिल कामाची योग्य त्या पुरवठादाराकडून **२०२६-२०२७** या आर्थिक वर्षाकरिता Item wise Rate Tender online निविदा मागवण्यात येत आहे.

सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून online पध्दतीने मंगणक प्रणालीवर प्रसिध्द होईल.


| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची निविदा फी (ना परताचा) gst करासहित | १% इसारा / बयाना रक्कम रुपये | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Provide Motar Pump Repairing and Serviceing At Grampanchayat Vadgaon Tal Khalapur Dist Raigad | | ११८ | १०००० | पुरवठादार |


**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे:**

1. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा, नोटीस, सुचना, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
2. वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिध्दी | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा फॉर्म व परिशीष्ट मिळवण्याचा कालावधी (डाउनलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी (अपलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांक: [ १९.०५.२०२६] सायंकाळी ५.०० मी. | | | |

3. सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वीकारली जाणार नाहीत. ती स्कॅन करून ऑनलाईन सादर करावी.
4. सदरील कोरी निविदा फी (Tender Fee) व इसारा अनामत रक्कम (EMD) NEFT व्दारे ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.
5. निविदा दर हे Item wise rate ने भरावयाचे आहे.
6. Registration ऑनलाईन सदर करावे.
7. Pancard कॉपी ऑनलाईन सदर करावी.
8. Adhar card कॉपी ऑनलाईन सदर करावी
9. Income tax परतावा ऑनलाईन सदर करावी.
10. GST प्रत online सदर करावी.
11. Gst भरणा चलन पावती सादर करावी.
12. प्रतिज्ञापत्रक (DECLARATION 100 bond) online सादर करावे.
13. शासकीय तसेच निमशासकीय व महामंडळ यांच्या काळ्या यादीत नसल्याचे घोषणा पत्र सादर करावे.
14. Online मागवलेल्या कागदपत्रावर निविदा धारकाची Digital Signature असणे आवश्यक आहे. नसल्यास अश्या निविदाधारकास निविदेत सहभाग घेता येणार नाही.
15. सदर निविदा प्रक्रीयेसाठी किमान 3 निविदाधारक आवश्यक आहेत. कमीत कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या कंत्राटदारास काम देण्याचा विचार केला जाईल.
16. कोणतेही कारण न दाखवता निविदा नाकारण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार प्रसिध्दीधारकाने राखून ठेवला आहे.
17. करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अश्या अधिकाऱ्याा समोर करून द्यावा लागेल.
18. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारे साहित्य पुरवठा होणार नाही.
19. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच संबधित ठेकेदाराची नोंदणी ज्या विभागाची आहे त्या विभागास नोंदणी काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.
20. निविदे बाबत काही वाद उद्भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत वडगाव निर्णय घेईल तो निर्णय निविदा धारकास बंधनकारक राहील.
21. मागवलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहील.

**सही/-**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

**सही/-**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

# रामशेठचा 'अमृत महोत्सव' 'लोकोत्सव' का होतो?

**मधुकर भावे**, ज्येष्ठ पत्रकार

श्री. रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस १३ मे रोजी साजरा होत आहे. ७५ वर्षे पूर्ण करून रामशेठ ७६व्या वर्षांत पाऊल ठेवत आहेत. सामाजिक जीवनात किंवा व्यक्तिगत जीवनात, अनेक व्यक्ती ५०, ७५, ८० असे टप्पे पार करत असतात. 'सुवर्ण महोत्सव', 'अमृत महोत्सव', 'सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा', अशी वेगवेगळी नावे याकरिता आहेत. यातील बहुसंख्य कार्यक्रम कौटुंबिक असतात. त्या-त्या व्यक्तीपुरते आणि त्या-त्या कुटुंबाच्या आनंदाचे असतात. ते स्वाभाविक आहे. सत्तेत असलेल्यांचे वाढदिवस धूमधडाक्यात होताना आपण पाहतो. रामशेठ यांच्या बाबतीत ज्या अनेक कोड्यांची उत्तरे शोधावी लागतील, त्यातलं हे एक कोडं आहे.

रामशेठ गेली २५ वर्षे कोणत्याही पदावर नाहीत. आमदार नाहीत, खासदार नाहीत, पण सतत लोकांमध्ये आहेत. त्यामुळे पदावर नसताना 'रामशेठ यांचा ७५वा वाढदिवस' हा व्यक्तिगत न राहता 'सार्वजनिक' का होतो, याचे उत्तर शोधले पाहिजे. ते उत्तर सोपे आहे. कोणत्याही पदावर, सत्तेत किंवा सत्ता पक्षात असल्यामुळे मोठेपण असा रामशेठच्या जीवनाचा लौकिक नाही. लोक त्यांच्याभोवती सदैव आहेत, त्यामुळे रामशेठ यांचा वाढदिवस हा 'व्यक्तीचा' न राहता 'समष्टि'चा होतो, सामुदायिक होतो हे सहसा न दिसणारे चित्र आहे. त्यामागे रामशेठ यांचे व्यक्तिमत्त्व दडलेले आहे. त्यांच्यातले 'माणूसपण' जसे मोठे आहे, त्याचप्रमाणे त्यांचे दैनंदिन जीवनातले साधेपण त्याहून मोठे आहे.

सार्वजनिक जीवनासाठी दुर्मीळ असलेले अनेक सद्गुण त्यांच्या वागण्यात सहज व्यक्त होतात. त्यात देखावा नसतो, जाहिरातबाजी नसते. 'उजव्या हाताचे डाव्या हातालाही कळत नाही', पण लोकांना या बारीक तपशीलाच्या





गोष्टी बरोबर माहीत असतात. व्यक्तीचे मोठेपण समजायला याच गोष्टी उपयोगी पडतात. रामशेठ यांचा अमृत महोत्सव 'लोकोत्सव' व्हायला याच गोष्टी कारणीभूत आहेत, असे माझे निरीक्षण आहे.

शे.का.पक्ष रामशेठ यांनी सोडला. त्या पक्षापासून बाजूला होताना त्यांनी पक्षाविरुद्धध एकही शब्द उच्चारला नाही. एवढेच नव्हे तर त्यावेळचे मुख्यमंत्री विलासराव आणि प्रदेशाध्यक्ष श्रीमती प्रभा राव त्यांच्या पाठी लागल्या होत्या की, 'तुम्ही लवकर काँग्रेसमध्ये या'. रामशेठ यांनी त्यांना नम्रपणे सांगितले की, '२००४च्या विधानसभा निवडणुकीत शे.का.पक्षाचे आमचे उमेदवार विवेकानंद पाटील यांना निवडून आणण्याचा शब्द मी दिला आहे. निवडणूक झाल्यानंतर मी नक्की काँग्रेसमध्ये येईन'. स्वतः उभे न राहता पक्षातल्या आपल्या सहकारी उमेदवारासाठी इतकी स्पष्ट भूमिका घेणे यामध्ये रामशेठ यांच्या सामाजिक मोठेपणाचा प्रत्यय जाणवतो. एवढंच नव्हे तर शेकाप सोडताना त्या पक्षाचे भव्य ऑफिस पनवेलमध्ये ज्या जागेत आहे, त्या जागेची मालकी रामशेठ यांची होती. पक्ष सोडताना त्यांनी त्या जागेच्या मालकीचा हक्क शेकापच्या नावावर कायदेशीरपणे करून दिला आणि पक्षाचा निरोप घेतला. रामशेठचा ७५वा वाढदिवस असो वा कोणताही कार्यक्रम असो, तो कार्यक्रम सार्वजनिक का होतो याची कारणे यात दडलेली आहेत.

शे.का.पक्षाच्या कार्यकर्त्यांनाही आज रामशेठ त्यांचे वाटतात, काँग्रेसवाल्यालाही रामशेठबद्दल आपलेपणा वाटतो. इंटकचे अध्यक्ष महेंद्र घरत हेही मोकळ्या मनाने त्यांचे अभिनंदन करताना संकोचत नाहीत. यात रामशेठ यांचे व्यक्तिमत्त्व दडलेलं आहे. रामशेठ केवळ 'दानशूर' आहेत म्हणून लोक जमत नाहीत, त्यांच्या दानशूरपणाची जाहिरात ते करत नाहीत, पण सहजपणे सांगून जातात की,... 'माझ्याजवळ काय होते? मी वर जाताना काही घेऊन जाणार आहे का?....' एकदा असे झाले की, त्यांच्या घरी एका कार्यकर्त्याने त्यांना सांगितले 'शेठ, देवळात घाट बांधायचा आहे, काही पैसे द्या...' रामशेठ यांनी खिशात हात घातला आणि त्याला हजार रुपये देऊन टाकले. तो म्हणाला हजारात काय होणार... रामशेठ यांनी आणखी हजार रुपये दिले. त्यावेळी मी तिथे बसलो होतो, माझे बोलणे झाल्यावर मी उठलो. बाहेर आलो, तो माणूसही माझ्या पाठोपाठ होता. तो त्याच्या बरोबरीच्या माणसाला सांगत होता की, ...'शेठला कसा फसवला...' मी ते शब्द ऐकले आणि माघारी गेलो... रामशेठना ऐकलेले शब्द सांगितले.. माझे मतंही सांगितले. रामशेठ यांनी काय म्हणावे?... 'त्याचे पाप त्याच्या जवळ, माझे पुण्य माझ्याजवळ...' इतक्या सोप्या शब्दांत देणाऱ्याच्या स्वच्छ, शुद्ध मनाची ओळख त्यांनी करून दिली. त्यापेक्षा आणखी वेगळे उदाहरण... त्यांच्यासोबत त्यांचे जन्म झालेले घर बघायला एकदा न्हावाखाडीला गेलो. तिथे जात असताना बाजूच्या एका झोपडीवजा घरातील पडवीत एक मावशी बसली होती. त्या मावशीने सहज म्हटले 'शेठ बऱ्याच दिवसांनी आलाय... बरं असा ना...' रामशेठनी खिशात हात घातला आणि हातात जेवढे पैसे आले ते त्या मावशीला देऊन टाकले. माझ्या मोबाइलमध्ये पटकन तो फोटो काढला. रामशेठच्या बरोबर रोज राहिलो, तर असे फोटो काढावे लागतील.

रयत शिक्षण संस्थेला सातारा येथे मुख्य संकुलात शिवाजी महाविद्यालयासाठी एक इमारत कमी पडत होती आणि संस्थेजवळ एवढा निधी नव्हता. अशावेळी रामशेठ यांनी ती भव्य इमारत स्वतःच्या पैशांनी बांधून दिली. त्या इमारतीचे लोकार्पण २७ डिसेंबर २०२१ रोजी देशाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते झाले. त्यांनीच आग्रह करून या इमारतीला लोकनेते रामशेठ ठाकूर भवन हे नाव दिले. त्यावेळच्या भाषणात ते म्हणाले होते की, 'ज्या भूमीवर रामशेठ यांनी शिक्षण घेतले, त्या भूमीला ते विसरले नाहीत...'कर्मवीर भाऊराव पाटील सांगायचे... 'मला जमीन द्या, मी त्याचे नंदनवन करतो'. कर्मवीरांचे हे शब्द रामशेठ यांनी नंतरच्या पिढीत सिद्ध करून दाखवले. खऱ्या अर्थाने ते कर्मवीरांचे शिष्य आहेत, कारण रयत शिक्षण संस्थेबद्दल त्यांच्या मनात आत्मियता आहे. त्यांची शैक्षणिक मातृसंस्था 'रयत' आहे.

संस्थापक भाऊराव पाटील यांच्या या संस्थेत लाखो तरुण शिकून मोठमोठ्या जागेवर गेले आहेत. त्यापैकी अनेक धनाढ्यही आहेत, पण अशा या धनाढ्य माजी विद्यार्थ्यांपैकी संस्थेचा विस्तार होण्याकरिता स्वतःच्या श्रमाची थैली घेऊन कोणी पुढे आला असे उदाहरण दिसलेले नाही. त्यामुळेच रयत संस्थेचे माजी कार्याध्यक्ष श्री. अनिल पाटील जाहीर समारंभात असे सांगू शकतात 'हमारे पास रामशेठ है...' याचा अर्थ समजून घेतला पाहिजे. आज रामशेठ यांच्या घरात पाऊल ठेवल्यावर दरवाजा उघडताच चार फोटो फ्रेम दिसतील. त्यात एक फोटो मातेचा, दुसरा फोटो पित्याचा, तिसरा फोटो राजकीय गुरू आणि रामशेठ यांचे सासरे श्री. जनार्दन भगतसाहेब यांचा आणि चौथा फोटो आहे तो कर्मवीर भाऊराव पाटील यांचा. 'रयत'मध्ये शिकलेल्या कोणा विद्यार्थ्यांच्या घरी भाऊरावांचा फोटो आईवडिलांच्या बाजूला लावलेला आहे असे दाखवून द्या. यातला प्रत्येक फोटो रामशेठ समजून घ्यायला उपयोगी पडतो.

साताऱ्याचे उदाहरण दुर्मीळ आहे. त्याहीपेक्षा अधिक मोलाची गोष्ट वाटते ती ही की, नवीन पालघर जिल्ह्यात 'मोखाडा' हे छोटेसे शहर आहे. ते आदिवासी वस्तीचे आहे. तिथे पूर्वी रस्ताही नव्हता. त्या जागेवर कर्मवीर भाऊरावांनी १०० वर्षांपूर्वी पत्र्याची शेड उभारली व उच्च शिक्षणाची सोय केली. भाऊरावांना आदिवासी भागात कॉलेज इमारत बांधावीशी वाटणं आणि ती इमारत मोडकळीला आल्यावर तिथे नवीन शैक्षणिक संकुल उभारून द्यावं असे रामशेठ यांना वाटणं... भाऊरावांची मानसिकता आणि रामशेठ यांची मानसिकता यांचं नातं किती घनिष्ट आहे असा विचार केला तर रामशेठही किती उंचीवर पोहचतात.

मोखाड्याला जाऊन रामशेठ यांनी शाळा नव्हे तर 'आर्ट्स, कॉमर्स, सायन्स' कॉलेज उभारून दिले. ८ एप्रिल २०२३ रोजी त्या भव्य संकुलाचे कडक उन्हात लोकार्पण झाले. त्या कार्यक्रमाचे मुख्य पाहुणे श्री. शरद पवारसाहेबच होते. सर्व निधीची व्यवस्था रामशेठ यांनी केली. बरं, एखाद्या दानशूराने ते पैसे संस्थेला देऊन टाकले असते आणि इमारती बांधण्याचा विषय त्या संस्थेवर सोपवून दिला असता. रामशेठ राहतात पनवेलला. पनवेलपासून मोखाडा १३२ किलोमीटर आहे. त्यात २८ किलोमीटरचा सिंगल लेनचा घाट... रामशेठ यांनी सलग तीन वर्षे ५० ते ६० वेळा मोखाड्याला खेपा घालून या महाविद्यालयाची नवीन इमारत पूर्ण करून घेतली. नाशिककहून 'रयत'चे उपाध्यक्ष अॅड. भगीरथ शिंदे त्यांची गाडी घेऊन मोखाड्याला




यायचे आणि पनवेलहून रामशेठ जायचे. प्राचार्य डॉ. एल.डी.भोर हा सगळा अनुभव सांगताना गदगदून गेले होते.

मी ज्या दिवशी ते कॉलेज पाहायला गेलो, तेव्हा घाट चढताना रस्त्याच्या बाजूला भरउन्हात आदिवासी भगिनी जमिनीवर बसून कैऱ्या, करवंद, कच्चे फणस, रस्त्यावर पानाचे वाटे मांडून विकायला बसल्या होत्या आणि त्यांच्या मुली मोखाडा येथे रामशेठने बांधलेल्या संगणकीय प्रशिक्षण वातानुकूलित हॉलमध्ये संगणकाचे शिक्षण घेत होत्या! ते सर्व पाहताना रामशेठच्या मोठेपणाला तोड नाही हे जाणवत होते. अनेक रात्री त्यांनी मोखाड्याला काढल्या. एक दोन वेळा असे झाले की घाट उतरताना त्यांची गाडी बंद पडली. त्या रस्त्यावर चुकून एखादी गाडी येते. गाडी बंद पडल्यानंतर रामशेठ गाडीतून खाली उतरले आणि घाट उतरायला सुरुवात केली. दोन किलोमीटर घाट उतरल्यानंतर एक ट्रक आला. त्या ट्रकला त्यांनी हात केला. ड्रायव्हरला थांबवले आणि ट्रकमधून ठाण्यापर्यंतचा प्रवास केला. गोष्ट छोटी आहे. फेसबुकवरही कुठेही फोटो झळकला नाही.

रामशेठ यांचे मोठेपण स्वतःची जाहिरात न करण्यात जसे आहे तसेच त्यांच्या साधेपणात आहे. त्यांच्या स्वभावात जसा फरक पडला नाही तसा त्यांच्या पोशाखातही फरक पडलेला नाही. सामान्य लोकांना त्यांच्याबद्दलचा आपलेपणा वाटतो. त्यांना भेटायला अडचण येत नाही. सहज भेटता येते. आपली अडचण मांडता येते. ते मदत करतात. नाव विचारत नाहीत, गाव विचारत नाहीत, पक्ष विचारत नाहीत, जात विचारत नाहीत... अशी रोजच्या सकाळी ही गर्दी असते.

लोक रामशेठना दानशूर म्हणतात. दानशूर शब्दात 'दान' देण्याचा एक अहंकारी भाव आहे. रामशेठच्या चेहऱ्यावर तो भाव कधी दिसत नाही. त्यांच्या नावातला 'शेठ' हा शब्द त्यांच्या सहज कृतीमुळे पूर्णपणे गळून पडल्यासारखा वाटतो. त्यांची श्रीमंती प्रत्यक्ष दौलतीपेक्षा मनाने मोजली, तर त्याचे मोजमाप करता येत नाही.

रामशेठसोबत प्रवासात जेवढे लोक असतात, त्या सगळ्यांना बरोबर घेऊन जेवणाची वेळ झाली की त्यांच्यासोबतच 'पावभाजी' खायलाही त्यांना संकोच वाटलेला नाही आणि जेवण झाल्यावर सगळ्यात पुढे जाऊन झालेलं बिल द्यायला रामशेठच असतात.

अमृत महोत्सव साजरा होत असल्यामुळे रामशेठ यांचं मोठेपण कळलं असं अजिबात नाही. ते मुळातच मनाने मोठे असल्यामुळे अमृत महोत्सव हा कौटुंबिक कार्यक्रम न राहता सार्वजनिक आनंदोत्सव झालेला आहे. परवा पनवेलहून येताना काही ठिकाणी पाट्या पाहिल्या. कोणी आरोग्य शिबिरे घेतलीत... कोणी हरिपाठ जाहीर केला आहे, कोणी सत्यनारायणाची सार्वजनिक पूजा घालत आहेत, कोणी विद्यार्थ्यांच्या सत्काराचे कार्यक्रम ठेवले आहेत असे फलक वाचले. 'हे सगळे रामशेठ करवून घेत आहेत', असे कोणी समजत असेल, तर रामशेठच्या कृतज्ञतेची, समाजाची नस त्यांना कळलेली नाही, एवढेच म्हणता येईल. हा उत्साह लोकांमध्ये येतो याचं कारण रामशेठ यांना राजकारण कुठे करायचे ते समजते. राजकारणापासून ते दूर झाले आणि समाजकारणाचा वसा त्यांनी घेतला व तो शब्द पाळला.

आणखी एक गुणविशेष असा की रामशेठ शे.का.पक्षात होते तेव्हा शे.का.पक्षाचा आमदार पनवेलमधून निवडून आणला. १९५२ला पहिल्या निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार आबासाहेब पन्हाळे पनवेलमधून विजयी झाले होते. १९५७, ६२, ६७, ७२, ७८, ८०, ८५, ९०, ९५, ९९, २००४, एवढ्या विधानसभा निवडणुकीत पनवेल मतदारसंघातून शे.का.पक्षाचा उमेदवार विजयी झालेला आहे. यापैकी ८०पासूनच्या प्रत्येक निवडणुकीत शे.का.पक्षाला मिळालेले विजय रामशेठच्या ताकदीमुळे मिळालेले आहेत. २००५ साली रामशेठ काँग्रेसमध्ये आले आणि २००९च्या विधानसभा निवडणुकीत प्रशांत ठाकूर काँग्रेसचे उमेदवार म्हणून १९५२नंतर पहिल्यांदा विजयी झाले. हा विजय काँग्रेसचा नव्हता, हा विजय रामशेठ ठाकूर यांचा होता आणि आहे. सर्वजण हे मान्य करतात. २०१३ला रामशेठ भाजपमध्ये आले. २०१४च्या विधानसभा निवडणुकीत पनवेलची जागा आयुष्यात पहिल्यांदा भाजपने जिंकली. प्रशांत ठाकूर भाजपचे आमदार म्हणून निवडून आले हाही एक इतिहासच आहे.

आधी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅ. ए.आर. अंतुले आणि नंतर दि.बा. पाटील यांच्याविरोधात शे.का.पक्षातर्फे रामशेठ लढत असताना १९९८, १९९९ दोन्ही वेळा ते लोकसभा निवडणुकीत विजयी झाले. हा विजयही शे.का.पक्षाचा नव्हता, तो रामशेठ यांचा विजय होता. जर शे.का.पक्षाचा असता, तर खुद्द दि.बा.पाटील.. दत्ता पाटील याच लोकसभा मतदारसंघातून शे.का.पक्षातर्फे लोकसभेसाठी उभे राहिले होते. दोघेही पराभूत का झाले? रामशेठ मात्र शे.का.पक्षाकडून दोन वेळा विजयी झाले. मग विजय कोणाचा...? पक्षाचा की रामशेठचा? लोक रामशेठच्या बरोबर आहेत. हे रामशेठ शे.का.पक्षात असतानाही दिसते, काँग्रेसमध्ये असतानाही दिसले आणि आता भाजपमध्ये असतानाही दिसत आहे. यामुळेच रामशेठ यांचा 'अमृत महोत्सव' हा 'लोकोत्सव' झाला आहे.

अनेक जणांचे अमृत महोत्सव होतात, जाहीर सत्कार समारंभ होतात, वृत्तपत्रात जाहिराती येतात, पण वाचक ती पानं उलटून पुढे जात असतात. दुसऱ्या दिवशी तो वाढदिवस विसरला जातो. रामशेठ यांचा 'अमृत महोत्सव' वर्षभर चालणारा कार्यक्रम आहे आणि त्यात सामान्य माणूस मनापासून सहभागी झालेला आहे. म्हणून हा 'लोकोत्सव' आहे. कोणताही माणूस जन्मसोहळ्याने मोठा होत नसतो... कर्तृत्व सोहळ्याने तो मोठा होतो. बारशाला ताशे, ढोल वाजवल्याने प्रत्येक बारसे झालेला कर्तृत्ववान होत नसतो. कर्तृत्वत्वान झाल्यानंतर ढोल-ताशे वाजत असतात. अशाच निवडक लोकांचा 'अमृत महोत्सव' हा 'लोकोत्सव' होत असतो. रामशेठ हे त्यापैकी आहेत आणि म्हणूनच वाढदिवसापूर्वी २ जून २०२५पासूनच त्यांच्या अमृत महोत्सवी वर्धापन दिनाचे कार्यक्रम सुरू झाले आहेत.



## आठवण होत आहे विलासरावांची...

१४ ऑगस्ट २०१२ रोजी महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे निधन झाले. यापूर्वी दोन महिने दोन दिवस अगोदर म्हणजे २ जून २०१२ रोजी रामशेठ यांच्या ६१व्या वाढदिवशी विलासरावांनी मुलाखत दिली होती. ती वाचताना आजही डोळे पाणावतील...

''रामशेठ हा निर्मळ मनाचा माणूस आहे. मी त्यांना अनेक वर्षे पाहतो आहे.. जवळून पाहतो आहे, लांबून पाहतो आहे. त्यांच्यासारखा काम करणारा नेता प्रत्येक जिल्ह्यात असेल, तर महाराष्ट्राचे चित्र पालटायला वेळ लागणार नाही. म्हणून मी नेहमी म्हणतो की, प्रत्येक जिल्ह्यात विधायक दृष्टीचा आणि शिक्षण क्षेत्रात ग्रामीण विद्यार्थ्यांना संधी देणारा एक रामशेठ मला हवा आहे. रामशेठ स्वतःकरिता काही मागत नाहीत. त्यांना खासदारकी पुन्हा मिळाली असती, पण त्यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय केला.

एकदा मला त्यांनी पनवेलला बोलावलं.. राजकीय कार्यक्रम नव्हता. कबड्डी स्पर्धेचे आयोजन होते. राजीव गांधी सुवर्णचषक कबड्डी स्पर्धा होती. शेवटचा सामना पंजाब विरुद्ध भारतीय रेल्वे होता. तो पाहता असताना अंगावर रोमांच आले होते. दुसऱ्यांदा पनवेलला गेलो. तो मल्हार महोत्सवाला, तिसऱ्यांदा पनवेलला गेलो तो प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाला. ५ ऑगस्टला २००५ला. मुख्यमंत्री असताना, पण तिथे वाढदिवस



नव्हता. स्वातंत्र्य सैनिकांच्या सत्काराचे आयोजन होते. प्रशांतला वाढदिवसाची काय भेट द्यावी याचा विचार करत होतो. तेवढ्यात रामशेठने सुचवले की, पनवेल एसटी स्टँडचा रस्ता क्रॉस करताना अपघात होतात. आम्हाला उड्डाणपूल द्या आणि मी ती मागणी जाहीरपणे मान्य केली. पुढच्या वेळी पनवेलला गेलो. तेव्हा त्यांच्या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे भूमिपूजन करायचे होते. हा तपशील एवढ्याकरिता सांगतो की, रामशेठ हा राजकारणी माणूस नाही. तो सामाजिक नेता आहे. आमची मैत्री निखळ मैत्री आहे. राजकारण करताना अशा निखळ भावनेने राजकारण केले की महाराष्ट्राचे वातावरण नेहमीच निरोगी राहील. माझ्या या मताशी महाराष्ट्र पूर्ण सहमत असेल.''



# रायगड जिल्ह्यात २८२ ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सध्या ६० टँकरने ६२ गावे आणि २२० वाड्यांना अश्या एकूण २८२ ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. महाड तालुक्यात ९८ ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे

जिल्ह्यात पाणीटंचाईच्या झळा आता अधिक तीव्र होत असून ग्रामीण भागातील नागरिकांचे हाल सुरू झाले आहेत. महाड तालुक्यात १३ गावे आणि ८५ वाड्या मिळून ९८ ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा केला पेण तालुक्यातील ९ गावे आणि ७४ वाड्या मिळून ८३ ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

मागील वर्षी मे महिन्याच्या दुसरया आठवडयात ४६ गावे आणि १८६ वाडया मिळून २३२ ठिकाणी पाणीटंचाई भासत होती. त्यावेळी ८६ हजार ७५३ इतक्या लोकसंख्येला टंचाईची झळ बसली होती. यावर्षी मे महिन्यात ६० टँकरने ६२ गावे आणि २२० वाड्यांना अश्या एकूण २८२ ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. यंदा गावांची संख्या वाढली आहे. तब्बल १ लाख ५ हजार ८६८ ग्रामस्थ टंचाईचा सामना करीत आहेत.

गतवर्षीच्या तुलनेत लोकसंख्येत २० हजारांनी वाढ झाली आहे. जून २०२५ अखेर ४३ गावे आणि २४२ वाडयांना टँकरने पाणी पुरवण्याची वेळ आली होती. मागील वर्षी तबबल ४२ टँकर लागले होते. पेण, खालापूर, रोहा, सुधागड, अलिबाग, महाड, पोलादपूर, उरण, तळा आणि म्हसळा तालुक्यांसाठी ९ कोटी ३० लाख रुपयांचा संभाव्य टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. यात टँकर व बैलगाडीने पाणीपुरवठा तसेच विंधन विहिरी खोदण्याचा समावेश आहे.

**जिल्ह्यातील टँकरची सद्यस्थिती**

| तालुका | गावे | वाड्या | टँकर | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| अलिबाग | ४ | ० | २ | ८७८२ |
| उरण | ० | ४ | १ | १३५१ |
| पनवेल | ९ | ४ | ८ | १४२४८ |
| कर्जत | ३ | १० | ७ | ६२०४ |
| खालापूर | ४ | ९ | ६ | ६५८८ |
| पेण | ९ | ७४ | १२ | २४४७६ |
| महाड | १३ | ८५ | ९ | २१८०३ |
| श्रीवर्धन | १ | ३ | १ | १६२६ |
| पोलादपूर | ६ | १३ | १ | २७६७ |
| म्हसळा | ६ | १ | ५ | ९८०८ |
| सुधागड | ० | २ | १ | २९० |

# भरडखोलमध्ये आज मत्स्य बंदराचा शुभारंभ

## मत्स्यव्यवसायमंत्री नितेश राणे यांची प्रमुख उपस्थिती

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सागरी विकासाला नवे बळ देणारा महत्त्वाकांक्षी टप्पा आज भरडखोल येथे साकारत आहे. महाराष्ट्र सागरी मंडळ आणि केंद्राच्या सागरमाला प्रकल्पांतर्गत श्रीवर्धन मधील भरडखोल येथे मत्स्यबंदर विकास कामाचा भूमिपूजन सोहळा बुधवार, दि. १३ मे रोजी सकाळी १० वाजता उत्साहात पार पडणार आहे. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते भूमिपूजन होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रायगडचे खासदार सुनील तटकरे असणार आहेत. यावेळी महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांचीही मान्यवर उपस्थिती लाभणार आहे.

तसेच रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश रामचंद्र वाकडीकर यांच्यासह अनेक खासदार, आमदार व विधान परिषद सदस्य उपस्थित राहणार असून, यामध्ये श्रीरंग बारणे, निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, प्रशांत ठाकूर, महेंद्र थोरवे, महेश बालदी, महेंद्र दळवी आणि अनिकेत तटकरे यांचा समावेश आहे.भरडखोल येथील "पकटीवाला पटांगण" येथे होणाऱ्या या सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता असून, या प्रकल्पामुळे मत्स्यव्यवसायाला चालना मिळून स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. या मत्स्यबंदराच्या विकासामुळे श्रीवर्धन तालुक्यातील सागरी अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल, तसेच मच्छीमारांना आधुनिक सुविधा उपलब्ध होणार असल्याने त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **कमळूबाई अविनाश ठाकूर** व इतर यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन :** मौजे – कळंबुसरे (५५३३३४ ),
ULPIN : ३६६०४६६४९३०, ता. उरण जि. रायगड

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २७ / ५ खाते क्रमांक २८८ | १ | ०.२१.३० पो.ख ०.०२.२० | ०.९१ |
| | | एकूण क्षेत्र ०.२३.५० | |
| **या एकूण क्षेत्राची विक्री ०.२३.५० गुंठे** | | | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार मिळकत, विकसित करणे बाबतचा करार, कुळ, हक्क वारसा, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा,पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती किवा त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्रे पत्रात पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावे अन्यथा दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क – हितसंबंध नाही व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून १४ दिवसांच्या मुदती नंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधन कारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १३ मे २०२६

**सही**
**ॲड. निलेश झंजाड**

बी १०४ सफायर, सी. एच. एस. लि., सेक्टर २२ भूखंड क्रमांक ३३/३४ कामोठे – ता.पनवेल, जि. रायगड
बि. सं. क्र. ९९२०४७५८०१

# 'बाटू'ची भरारी : ११ प्राध्यापकांचा जागतिक शास्त्रज्ञांच्या यादीत समावेश

**माणगाव : बातमीदार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (DBATU), लोणेरे येथील शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स २०२६' ने जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील शास्त्रज्ञांच्या मानांकन यादीत विद्यापीठातील तब्बल ११ प्राध्यापकांनी स्थान पटकावून आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली मोहोर उमटवली आहे.

ए.डी. सायंटिफिक इंडेक्स ही केवळ विद्यापीठाचे मूल्यमापन करणारी संस्था नसून ती शास्त्रज्ञांच्या वैयक्तिक वैज्ञानिक कामगिरीवर लक्ष केंद्रित करते. प्राध्यापकांनी केलेले संशोधन, त्यांच्या शोधनिबंधांची आंतरराष्ट्रीय व्याप्ती आणि वैज्ञानिक उत्पादकता (Scientific Productivity) या निकषांच्या आधारे ही जागतिक क्रमवारी जाहीर केली जाते.

या गौरवास्पद यादीत अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील खालील तज्ज्ञांचा समावेश आहे:

१)डॉ. एस. एन. नलबलवार २)डॉ. एस. एम. जाधव ३)डॉ. आर. एस. पावडे ४)डॉ. एन. अग्रवाल ५)डॉ. ब्रिजेश अय्यर६)डॉ. व्ही. जी. सरगडे ७)डॉ. वाय. एस. महाजन ,८)डॉ. बी. एफ. जोगी ९)डॉ. ए. बी. नांदगावकर १०)डॉ. ए. डब्ल्यू.किवळेकर,११)डॉ. व्ही. जे. कदम

संशोधन क्षेत्रातील या यशामुळे केवळ विद्यापीठाचेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे नाव जागतिक स्तरावर अभिमानाने घेतले जात आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पोयंजे तहसील पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार सीमा वेंकट अय्यर व एल.आर. व्यंकटरमण यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणेः–

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे पोयंजे,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|
| | लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | रू.पै. |
| २०९ | ०–८२–८० | ०–०४–५० | ०–८७–३० | १४.०० |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **०७** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १२/०५/२०२६

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्कः– ८८८८२७१७५९

A REPUTED ENGLISH MEDIUM SCHOOL IN KHALAPUR
Requires qualified teachers
PRIMARY SECTION
B.Sc., B.Ed (SCIENCE & MATHS)
B.A., B.Ed (ENGLISH/HISTORY)
PRE PRIMARY SECTION
HSC/Graduate with ECCEd
Candidates should possess excellent communication skills in English & Marathi.
Contact Details
Email id: hmehsjc@gmail.com
Mobile : 9967976638

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन – ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई–मेलः coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइटः kbmc.gov.in.

**जा.क्र. : कुबनप/नगरोत्थान/साबां/१०८/२०२६–२७** **दिनांक :– १२/०५/२०२६**

### जाहिर ई– निविदा सुचना क्र. ०५ /२०२६-२७

कुळगांव–बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत सन **२०२६–२७** करिता प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या **०१** विकास कामासाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई–निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई–निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.**१३/०५/२०२६** ते दि.**२०/०५/२०२६** रोजी दुपारी **१२.००** वाजेपर्यंत असून दि.**१५/०५/२०२६** रोजी दुपारी. **१२.००** वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई–निविदा दि. **२१/०५/२०२६** रोजी दुपारी **१२.००** वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/–**
**(मारुती गायकवाड)**
मुख्याधिकारी– तथा प्रशासक
कुळगांव बदलापूर नगरपरिषद

## खुली ई–निविदा सूचना

**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव खालापूर**

**सूचना क्रमांक : सन 2026–2027**

ग्रुप ग्रामपंचायत वडगाव तालुका खालापूर जिल्हा रायगड यांचेकडील ग्रामपंचायत फंड विकास कामा अंतर्गत खालिल कामाची योग्य त्या पुरवठादाराकडून **२०२६–२०२७** या आर्थिक वर्षाकरिता Item wise Rate Tender online निविदा मागवण्यात येत आहे.

सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून online पध्दतीने मंगणक प्रणालीवर प्रसिध्द होईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची निविदा फी (ना परताचा) gst करासहित | १% इसारा / बयाना रक्कम रुपये | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Provide disinfectant material at Grampanchayat Vadgaon Tal Khalapur Dist Raigad | | **११८** | **१००००** | पुरवठादार |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे:**

1. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा, नोटीस, सुचना, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
2. वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिध्दी | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा फॉर्म व परिशीष्ट मिळवण्याचा कालावधी (डाउनलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी (अपलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांकः[ १९.०५.२०२६] सायंकाळी ५.०० मी. | | | |

3. सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वीकारली जाणार नाहीत. ती स्कॅन करून ऑनलाईन सादर करावी.
4. सदरील कोरी निविदा फी (Tender Fee) व इसारा अनामत रक्कम (EMD) NEFT व्दारे ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.
5. निविदा दर हे Item wise rate ने भरावयाचे आहे.
6. Registration ऑनलाईन सदर करावे.
7. Pancard कॉपी ऑनलाईन सदर करावी.
8. Adhar card कॉपी ऑनलाईन सदर करावी
9. Income tax परतावा ऑनलाईन सदर करावी.
10. GST प्रत online सदर करावी.
11. Gst भरणा चलन पावती सादर करावी.
12. प्रतिज्ञापत्रक (DECLARATION 100 bond) online सादर करावे.
13. शासकीय तसेच निमशासकीय व महामंडळ यांच्या काळ्या यादीत नसल्याचे घोषणा पत्र सादर करावे.
14. Online मागवलेल्या कागदपत्रावर निविदा धारकाची Digital Signature असणे आवश्यक आहे. नसल्यास अश्या निविदाधारकास निविदेत सहभाग घेता येणार नाही.
15. सदर निविदा प्रक्रीयेसाठी किमान 3 निविदाधारक आवश्यक आहेत. कमीत कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या कंत्राटदारास काम देण्याचा विचार केला जाईल.
16. कोणतेही कारण न दाखवता निविदा नाकारण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार प्रसिध्दीधारकाने राखून ठेवला आहे.
17. करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अश्या अधिकाऱ्याा समोर करून द्यावा लागेल.
18. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारे साहित्य पुरवठा होणार नाही.
19. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच संबधित ठेकेदाराची नोंदणी ज्या विभागाची आहे त्या विभागास नोंदणी काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.
20. निविदे बाबत काही वाद उद्भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत वडगाव निर्णय घेईल तो निर्णय निविदा धारकास बंधनकारक राहील.
21. मागवलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहील.

**सही/–**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

**सही/–**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

## खुली ई–निविदा सूचना

**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव खालापूर**

**सूचना क्रमांक : सन 2026–2027**

ग्रुप ग्रामपंचायत वडगाव तालुका खालापूर जिल्हा रायगड यांचेकडील ग्रामपंचायत फंड विकास कामा अंतर्गत खालिल कामाची योग्य त्या पुरवठादाराकडून **२०२६–२०२७** या आर्थिक वर्षाकरिता Item wise Rate Tender online निविदा मागवण्यात येत आहे.

सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून online पध्दतीने मंगणक प्रणालीवर प्रसिध्द होईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची निविदा फी (ना परताचा) gst करासहित | १% इसारा / बयाना रक्कम रुपये | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Provide Computer Materials at Grampanchayat vadgaon Tal Khalapur Dist Raigad | | **११८** | **१००००** | पुरवठादार |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे:**

1. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा, नोटीस, सुचना, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
2. वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिध्दी | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा फॉर्म व परिशीष्ट मिळवण्याचा कालावधी (डाउनलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी (अपलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांकः[ १९.०५.२०२६] सायंकाळी ५.०० मी. | | | |

3. सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वीकारली जाणार नाहीत. ती स्कॅन करून ऑनलाईन सादर करावी.
4. सदरील कोरी निविदा फी (Tender Fee) व इसारा अनामत रक्कम (EMD) NEFT व्दारे ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.
5. निविदा दर हे Item wise rate ने भरावयाचे आहे.
6. Registration ऑनलाईन सदर करावे.
7. Pancard कॉपी ऑनलाईन सदर करावी.
8. Adhar card कॉपी ऑनलाईन सदर करावी
9. Income tax परतावा ऑनलाईन सदर करावी.
10. GST प्रत online सदर करावी.
11. Gst भरणा चलन पावती सादर करावी.
12. प्रतिज्ञापत्रक (DECLARATION 100 bond) online सादर करावे.
13. शासकीय तसेच निमशासकीय व महामंडळ यांच्या काळ्या यादीत नसल्याचे घोषणा पत्र सादर करावे.
14. Online मागवलेल्या कागदपत्रावर निविदा धारकाची Digital Signature असणे आवश्यक आहे. नसल्यास अश्या निविदाधारकास निविदेत सहभाग घेता येणार नाही.
15. सदर निविदा प्रक्रीयेसाठी किमान 3 निविदाधारक आवश्यक आहेत. कमीत कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या कंत्राटदारास काम देण्याचा विचार केला जाईल.
16. कोणतेही कारण न दाखवता निविदा नाकारण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार प्रसिध्दीधारकाने राखून ठेवला आहे.
17. करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अश्या अधिकाऱ्याा समोर करून द्यावा लागेल.
18. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारे साहित्य पुरवठा होणार नाही.
19. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच संबधित ठेकेदाराची नोंदणी ज्या विभागाची आहे त्या विभागास नोंदणी काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.
20. निविदे बाबत काही वाद उद्भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत वडगाव निर्णय घेईल तो निर्णय निविदा धारकास बंधनकारक राहील.
21. मागवलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहील.

**सही/–**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

**सही/–**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

## खुली ई–निविदा सूचना

**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव खालापूर**

**सूचना क्रमांक : सन 2026–2027**

ग्रुप ग्रामपंचायत वडगाव तालुका खालापूर जिल्हा रायगड यांचेकडील ग्रामपंचायत फंड विकास कामा अंतर्गत खालिल कामाची योग्य त्या पुरवठादाराकडून **२०२६–२०२७** या आर्थिक वर्षाकरिता Item wise Rate Tender online निविदा मागवण्यात येत आहे.

सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून online पध्दतीने मंगणक प्रणालीवर प्रसिध्द होईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची निविदा फी (ना परताचा) gst करासहित | १% इसारा / बयाना रक्कम रुपये | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1. | ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाडी सेविका व आशा मेविकांना आवश्यक स्टेशनरी व इतर साहित्य पुरविणे | **३५००००** | **११८** | **३५००** | पुरवठादार |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे:**

1. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा, नोटीस, सुचना, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
2. वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिध्दी | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा फॉर्म व परिशीष्ट मिळवण्याचा कालावधी (डाउनलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी (अपलोड ) | १२.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पासून | १८.०५.२०२६ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांकः[ १९.०५.२०२६] सायंकाळी ५.०० मी. | | | |

3. सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वीकारली जाणार नाहीत. ती स्कॅन करून ऑनलाईन सादर करावी.
4. सदरील कोरी निविदा फी (Tender Fee) व इसारा अनामत रक्कम (EMD) NEFT व्दारे ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.
5. निविदा दर हे Item wise rate ने भरावयाचे आहे.
6. Registration ऑनलाईन सदर करावे.
7. Pancard कॉपी ऑनलाईन सदर करावी.
8. Adhar card कॉपी ऑनलाईन सदर करावी
9. Income tax परतावा ऑनलाईन सदर करावी.
10. GST प्रत online सदर करावी.
11. Gst भरणा चलन पावती सादर करावी.
12. प्रतिज्ञापत्रक (DECLARATION 100 bond) online सादर करावे.
13. शासकीय तसेच निमशासकीय व महामंडळ यांच्या काळ्या यादीत नसल्याचे घोषणा पत्र सादर करावे.
14. Online मागवलेल्या कागदपत्रावर निविदा धारकाची Digital Signature असणे आवश्यक आहे. नसल्यास अश्या निविदाधारकास निविदेत सहभाग घेता येणार नाही.
15. सदर निविदा प्रक्रीयेसाठी किमान 3 निविदाधारक आवश्यक आहेत. कमीत कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या कंत्राटदारास काम देण्याचा विचार केला जाईल.
16. कोणतेही कारण न दाखवता निविदा नाकारण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार प्रसिध्दीधारकाने राखून ठेवला आहे.
17. करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अश्या अधिकाऱ्याा समोर करून द्यावा लागेल.
18. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारे साहित्य पुरवठा होणार नाही.
19. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच संबधित ठेकेदाराची नोंदणी ज्या विभागाची आहे त्या विभागास नोंदणी काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.
20. निविदे बाबत काही वाद उद्भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत वडगाव निर्णय घेईल तो निर्णय निविदा धारकास बंधनकारक राहील.
21. मागवलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहील.

**सही/–**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

**सही/–**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगाव**

# दिल्लीचा पंजाबवर शानदार विजय

## अक्षर, मिलरची अर्धशतके



**धर्मशाळा : वृत्तसंस्था**

अक्षर पटेल (५६), डेव्हिड मिलर (५१) यांची तडफदार अर्धशतके आणि स्टार्क-माधव तिवारी यांच्या भेदक गोलंदाजीच्या बळावर दिल्ली कॅपिटल्सने मोक्याच्या क्षणी आपला खेळ उंचावत पंजाब किंग्जला तीन गडी राखून निसटती मात दिली. प्रारंभी, श्रेयस अय्यर (नाबाद ५९) व प्रियांश आर्य (५६) यांच्या झंझावाती अर्धशतकांच्या बळावर पंजाबने २० षटकांत ५ बाद २१० धावांचा डोंगर रचला होता. प्रत्युत्तरात दिल्लीने त्याहीपेक्षा धमाकेदार खेळ साकारत १९ षटकांत ७ बाद २१६ धावांसह विजय खेचून आणला.

विजयासाठी २११ धावांचे आव्हान असताना के.एल. राहुल (९), अभिषेक पोरेल (५), साहिल पारीख (१३), स्टब्ज (१२) स्वस्तात बाद झाल्याने दिल्लीची एकवेळ ८.२ षटकांत ४ बाद ७४ अशी स्थिती होती, मात्र कर्णधार अक्षर पटेलने (३० चेंडूंत ५६) आणि डेव्हिड मिलरने (२८ चेंडूंत ५१) यांनी पाचव्या गड्यासाठी ६४ धावांची भागीदारी साकारत संघाला विजयाच्या ट्रॅकवर आणले. शेवटच्या टप्प्यात आशुतोष शर्मा (१० चेंडूंत २४) बाद झाल्यानंतर माधव तिवारी (८ चेंडूंत नाबाद १८) आणि अकिब नबी (२ चेंडूंत नाबाद १०) यांनी विजयाचे सोपस्कार पूर्ण केले. या विजयासह दिल्लीने १० गुणांसह प्ले ऑफसाठी आशाअपेक्षा कायम ठेवल्या.

प्रारंभी पंजाब किंग्जने ५ बाद २१० धावांपर्यंत मजल मारली. सलामीवीर प्रियांश आर्यच्या झंझावाती अर्धशतकानंतर दिल्लीच्या वेगवान गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत सामन्यावर पकड मिळवली. प्रियांशने अनुभवी मिचेल स्टार्कच्या पहिल्याच षटकात २२ धावा कुटत पंजाबला आक्रमक सुरुवात करून दिली. त्याने केवळ ३३ चेंडूंत ५६ धावांची खेळी केली. यात अर्धा डझन षटकारांचा समावेश होता. त्याने स्टार्कसोबतच लुंगी एन्गिडी आणि मुकेश कुमारचाही समाचार घेतला.

कर्णधार श्रेयस अय्यर (३६ चेंडूंत नाबाद ५९) आणि कूपर कॉनोली (२७ चेंडूंत ३८) यांनी तिसऱ्या विकेटसाठी ८३ धावा जोडल्या, मात्र त्यांना धावगती वाढवण्यात फारसे यश आले नाही. १९व्या षटकात मिचेल स्टार्कने मार्कस स्टॉईनिस आणि शशांक सिंगला लागोपाठच्या चेंडूंवर माघारी धाडले. अखेरच्या षटकात लुंगी एन्गिडीने पंजाबला रोखून धरले.

चौकार, षटकारांची आतषबाजी

धर्मशाळेच्या फलंदाजीला पोषक खेळपट्टीवर दोन्ही संघांनी एकत्रित ४२६ धावांचा रतीब घातला. पंजाबच्या डावात १५ चौकार व १३ षटकार, तर दिल्लीच्या डावात तब्बल २१ चौकार व ११ षटकारांचा समावेश राहिला.

# राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी बदलापूर सज्ज

**बदलापूर : प्रतिनिधी**

प्रतिष्ठेच्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी बदलापूर शहर सज्ज झाले असून १३ ते १७ मे कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेसाठी राज्याच्या आठ विभागातील ३८४ खेळाडूंचा थरार रंगणार आहे.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, व्हॉलीबॉल असोसिएशन आणि कुळगाव-बदलापूर नगर परिषद यांच्या संयुत विद्यमाने आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी सायंकाळी ६ वाजता हेंद्रेपाडामधील बदलापूर जिमखाना मैदानावर होईल. या वेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, कुळगाव-बदलापूरच्या नगराध्यक्ष रूचिता घोरपडे, क्रीडा सचिव रणजीतसिंह देओल, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले आदी मान्यवर उपस्थित राहाणार आहेत.

तब्बल दोन वर्षांनंतर होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी राज्यभरातील खेळाडूंचे आगमन बदलापूर नगरीत झाले आहे. ८ विभागातील ३८४ खेळाडू, ३२ मार्गदर्शक, ३२ व्यवस्थापक, एकूण ४४८ जणांचे पथक स्पर्धेसाठी सज्ज झाले आहे. स्पर्धेत कोल्हापूर, लातूर, अमरावती, संभाजीनगर, पुणे, नागपूर, मुंबई व नाशिक या संघात चुरशीच्या लढती रंगणार आहे. १८ व २१ वर्षांखालील युवकांचा व्हॉलीबॉलचा थरार प्रथमच बदलापूरमध्ये पहाण्यास मिळणार आहे.

मंगळवारी स्पर्धा आढावा बैठकीनंतर कुळगाव-बदलापूरच्या नगराध्यक्ष रूचिता घोरपडे यांनी मैदानाची पाहणी केली. यावेळी मुख्याधिकारी मारूती गायकवाड, नगरसेवक किरण भोईर, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव निलेश जगताप व ठाणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन पदाधिकारी उपस्थित होते.

पहिली छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा १५ ते २१ मे २०११दरम्यान पुण्यातील बालेवाडी येथे पार पडली. गत दोन वर्षांपूर्वी बुलडाणा येथे स्पर्धा झाली. आता तब्बल दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर बदलापूरनगरीत व्हॉलीबॉलचा उत्सव रंगणार आहे. विजेत्यांना २३ लाख ३५ हजारांची रोख बक्षिसे व करंडक, पदके देण्यात येणार आहेत.

# विराटला बदनाम करण्यासाठी मला पैशांची ऑफर होती; जर्मन मॉडेलचा धक्कादायक दावा

**बर्लिन : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटचा सुपरस्टार विराट कोहली बाबत जर्मन मॉडेल लिजलाजने मोठा खुलासा केला आहे. विराट कोहलीला बदनाम करण्यासाठी काही माध्यमांकडून मला पैसे ऑफर करण्यात आले होते, असा दावा तिने एका मुलाखतीत केला आहे, मात्र आपण तो प्रस्ताव स्पष्टपणे नाकारल्याचेही तिने सांगितले.

लिजलाजने 'फिल्मीमंत्रा'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, यावर्षीच्या सुरुवातीला विराट कोहलीने तिच्या इन्स्टाग्राम रीलला लाईक केले होते. त्यानंतर सोशल मीडियावर या गोष्टीची मोठी चर्चा रंगली. विराट कोहली हा जगातील सर्वाधिक फॉलो केला जाणाऱ्या क्रिकेटपटूंमध्ये अग्रस्थानी असून इन्स्टाग्रामवर त्याचे २७३ मिलियनहून अधिक फॉलोअर्स आहेत. त्यामुळे त्याच्या प्रत्येक सोशल मीडिया हालचालीवर चाहत्यांचे बारकाईने लक्ष असते.

लिजलाजने सांगितले की, त्या घटनेनंतर भारतातील अनेक मीडिया आउटलेट्सनी माझ्याशी संपर्क साधला. विराट कोहलीविरोधात बोलण्यासाठी आणि त्याची नकारात्मक प्रतिमा तयार करण्यासाठी मला पैशांची ऑफर देण्यात आली, पण मी ती ऑफर नाकारली, कारण विराट माझा आवडता क्रिकेटर आहे. मी कधीच त्याच्याविरोधात बोलू शकत नाही.

तिने पुढे सांगितले की, विराटने तिची रील लाईक केल्यावर ती भावूक झाली होती. "मला खूप आश्चर्य वाटले आणि आनंदही झाला. इतक्या मोठ्या क्रिकेट स्टारने माझी पोस्ट पाहिली, हीच माझ्यासाठी मोठी गोष्ट होती," असे तिने म्हटले.

लिजलाजने विराट कोहलीचे कौतुक करताना त्याची तुलना फुटबॉल सुपरस्टार्स लिओनेल मेस्सी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो यांच्याशी केली. "विराट कोहली हा आशियाचा मेस्सी आणि रोनाल्डो आहे. त्याची लोकप्रियता, चाहतावर्ग आणि प्रभाव प्रचंड मोठा आहे. भारतात विराटशी संबंधित अगदी छोटी गोष्टही मोठी बातमी बनते," असे ती म्हणाली.

# प्रियांश आर्यची स्फोटक खेळी; मोजक्या खेळाडूंच्या यादीत मिळवले स्थान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

धरमशाला येथील मैदानात पंजाब किंग्सच्या संघातील अनकॅप्ड सलामीवीर प्रियांश आर्य याने दिल्ली कॅपिटल्स विरुद्धच्या सामन्यात मिचेल स्टार्कच्या पहिल्याच चेंडूवर उत्तुंग षटकार मारत खाते उघडले. आयपीएलमध्ये मोजक्याच खेळाडूंनी डावातील पहिल्या चेंडूवर षटकार मारला आहे. प्रियांशने दुसऱ्यांदा ही कामगिरी करताना स्टार्कच्या षटकात २२ धावा कुटल्या. आक्रमक खेळी कायम ठेवत त्याने २४ चेंडूत आयपीएल कारकिर्दीतील पाचवे अर्धशतक पूर्ण केले.



प्रियांश आर्य हा आपल्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जातो. दिल्ली प्रीमियर लीग स्पर्धेत सहा चेंडूत सहा षटकार मारल्यावरच तो चर्चेत आला होता. याच कामगिरीच्या जोरावर पंजाब किंग्सच्या संघाने या खेळाडूवर कोट्यवधीचा डाव खेळला होता. आयपीएलमध्ये दुसऱ्यांदा त्याने पहिल्या चेंडूवर षटकार मारल्याचे पहायला मिळाले. यशस्वी जैस्वाल या यादीत अव्वलस्थानी आहे. राजस्थान रॉयल्सच्या संघाकडून यशस्वीने चार वेळा अशी कामगिरी करून दाखवली आहे. त्याचा रेकॉर्ड प्रियांशच्या अगदी टप्प्यात आहे.

नमन ओझा हा आयपीएलमध्ये डावाच्या सुरुवात करताना पहिल्या षटकातील पहिल्या चेंडूवर षटकार मारणारा पहिला फलंदाज आहे. २००९च्या हंगामात त्याने राजस्थान रॉयल्सच्या ताफ्यातून खेळताना कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या सामन्यात ब्रॅड हॉज गोलंदाजीवर हा पराक्रम केला होता. त्यानंतर १० वर्षांनी आरसीबीकडून विराट कोहलीने २०१९च्या हंगामात राजस्थान रॉयल्सच्या ताफ्यातील गोलंदाज वरुण ॲरोनच्या षटकात पहिल्या चेंडूवर षटकार मारत खाते उघडले होते. या यादीत फिल सॉल्ट, सनील नरेन, संजू सॅमसन, रॉबिन उथप्पा आणि मयंक अग्रवाल यांचाही समावेश आहे.

# बांगलादेशने दिला पाकिस्तानला दणका!

## मीरपूर कसोटीत दिमाखदार विजय, नाहिद राणाचा 'पंजा'



**मीरपूर : वृत्तसंस्था**

पाचही दिवस सातत्याने चांगला खेळ करत बांगलादेशने मीरपूर कसोटीत पाकिस्तानला नमवण्याची किमया केली. दोन वर्षांपूर्वी बांगलादेशने पाकिस्तानला पाकिस्तानामध्ये हरवले होते. तशाच सातत्याने खेळ करत बांगलादेशने पाकिस्तानवर १०४ धावांनी दिमाखदार विजय मिळवला. या विजयासह बांगलादेशने दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. कर्णधार नझमुल हसन शंटोचे शतक आणि मोमिनुल हकच्या ९१ धावांच्या खेळीच्या बळावर बांगलादेशने ४१३ धावांची मजल मारली. शंटोने १२ चौकार आणि दोन षटकारांसह १०१ धावा केल्या. मोमिनुलने १० चौकारांसह ९१ धावा केल्या. अनुभवी मुशफकीर रहीमने ७१ धावा करत या दोघांना चांगली साथ दिली. पाकिस्तानतर्फे मोहम्मद अब्बासने पाच विकेट्स घेतल्या. शाहीन शहा आफ्रिदीने तीन विकेट्स घेत त्याला चांगली साथ दिली.

प्रत्युत्तरादाखल खेळताना पदार्पणवीर अझान अवैसच्या शानदार शतकाच्या जोरावर पाकिस्तानने ३८६ धावा केल्या. अझानने १४ चौकारांसह १०३ धावांची खेळी साकारली. अब्दुल्ला फझल (६०), सलमान अघा (५८) आणि मोहम्मद रिझवान (५९) यांनी अर्धशतकी खेळी केल्या. बांगलादेशतर्फे मेहदी हसन मिराझने पाच विकेट्स घेतल्या. यासह बांगलादेशने २७ धावांची अल्प आघाडी घेतली.

बांगलादेशने दुसऱ्या डावात २४० धावांवर डाव घोषित केला. कर्णधार शंटोने सात चौकारांसह ८७ धावांची खेळी केली. मोमिनुल हकने ५६ धावा करत त्याला चांगली साथ दिली. चौथ्या दिवसाचा बराच वेळ पावसामुळे वाया गेला. त्यामुळे बांगलादेशने पाचव्या दिवशीही डाव सुरूच ठेवला. अडीच सत्र बाकी असताना बांगलादेशने पाकिस्तानला २६८ धावांचे लक्ष्य दिले.

पाचव्या दिवशी आव्हानात्मक खेळपट्टीवर पाकिस्तानच्या फलंदाजांची भंबेरी उडाली. अब्दुल्ला फझलने ६६ धावांची एकाकी झुंज दिली. कर्णधार शान मसूद दोन करून तंबूत परतला. अनुभवी सलमान अघा आणि सौद शकील मोठी खेळी करू शकले नाहीत. बांगलादेशतर्फे वेगवान गोलंदाज नाहिद राणाने भेदक मारा करत पाच विकेट्स पटकावल्या. तास्किन अहमद आणि ताजिअुल इस्लाम यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेत नाहिदला चांगली साथ दिली. पाकिस्तानचा दुसरा डाव ५२.५ षटकांत १६३ धावांतच आटोपला.












**पनवेल : येथील महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ९च्या नगरसेविका ॲड. प्रतिभा भोईर यांचा वाढदिवस मंगळवारी साजरा झाला. यानिमित्त त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांची भेट घेत आशीर्वाद घेतले. दोघांनीही ॲड. प्रतिभा भोईर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, नगरसेविका दर्शना भोईर, सुभाष भोईर, वर्षा नाईक, शिल्पा म्हात्रे, यश भोईर आदी उपस्थित होते.**






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com